विश्वासी समर्पण

Rs. 10/- | Vol. 34 - Issue 7 | July 2021
Web Copy

अवलंबुन राहा

विश्ववाणी समर्पण
जुलै- २०२१

विश्ववाणी समर्पण मासिक: तामीळ, मल्याळम, तेलुगु, कन्नड, मराठी, गुजराती, हिंदी, ओडीया, बंगाली, इंग्लिश, कोकबोरोक, आणि सौरा या भाष्यांमध्ये प्रकाशित केले जाते. वार्षिक देणगी १०० रू.

PUBLICATION OFFICE:
1-10-28/247, Anandapuram, Kushaiguda,
ECIL Post, Hyderabad. Ph: 040-27125557.
Email: Samarpan@vishwavani.org

ADMIN. OFFICE:
20, Raghul Street, T.M.P. Nagar, Pudur,
Ambattur, Chennai-600053.
Ph: 044-26869200.
Email: vishwavaninet@vishwavani.org

स्टेट ऑफिस
प्रज्ञाकिरण सोसायटी, जी-२, भवानी नगर, ऑपो. प्रेम ऑटो,
बिर्ला कॉलेज रोड, कल्याण, (पश्चिम), ठाणे- ४२१३०१
ऑफीस फोनः ८००७३७७७३३

अनुक्रमणिका

०२... मननाचे मुद्दे
०४... एक्झीक्युटीव्ह डायरेक्टरचे पत्र
०८... मुख्य आकर्षण
०९... प्रार्थना
१०... नेटवर्क अध्यक्षांकडून
१४... स्टेट कॉर्डिनेटरचे पत्र
१६... सुंदर भावना
२४... क्षेत्रीय वार्ता
३७... महाराष्ट्र सेवाक्षेत्रातुन

दर्शनः
प्रभू येशूच्या गौरवशाली शूभवर्तमानाद्वारे भारतातील खेडी आशिर्वादित होताना पाहणे.

Emil Annan's

मननाचे मुद्दे...

- फांद्या, ज्या पसरतात आणि वाढतात फांद्या, ज्या मोठया खोडावर झुकतात इतर फांद्या, ज्या जमिनीवर पडतात आणि पायाखाली तुडवल्या जातात.
- फांद्या ज्या झाडापासुन फुटतात आणि त्यात राहतात त्या, त्यांच्या योग्य वेळी फळे देतात, त्यांची पाने कोमजत नाहीत.
- काही व्यक्ती स्वतःशी बोलतात, झोपेत किंचाळतात ते त्यांच्या हृदयाकडे लक्ष देत नाहीत. त्या अशा व्यक्ती आहेत ज्या स्वतःवरच अवलंबुन राहतात.
- लहान मुल त्याच्या आईशिवाय राहु शकते का? मनुष्य स्वतःला आपल्या निर्माण कर्त्यापासुन वेगळे करू शकतो का?
- जे स्वतःच्या बुध्दीवर, स्वतःच्या कार्यक्षमतेवर, पैसा, हुद्दा आणि स्वपवित्रेवर अवलंबुन राहतात, ते वाळुवर बांधलेल्या इमारती प्रमाणे आहेत. जे येशु ख्रिस्तावर विश्वास ठेवुन जगतात, जो सर्वसमर्थ आहे, ते खडकावर बांधलेल्या इमारती सारखे आहेत. येशू म्हणाला, मला काही अशक्य नाही.
- अवलंबुन राहा आणि जगा.. बांधावर जय मिळविण्यासाठी अडखळणे तोडण्यासाठी येशु ख्रिस्तावर अवलंबुन राहा आणि जगा.
- लाटा ओलांडण्यासाठी येशु ख्रिस्तावर अवलंबुन राहा, जो समुद्रावर चालला, मनुष्यांच्या कपटावर मात करण्यासाठी येशू ख्रिस्तावर अवलंबुन राहा, जो मनुष्यांचे हृदय जाणतो.
- पराभवावर मात करण्यासाठी, येशु ख्रिस्तावर अवलंबुन राहा, जो आम्हास जय देतो. मृत्युच्या भयावर मात करण्यासाठी येशु ख्रिस्तावर राहा ज्याने मृत्युचा पराभव केला.
- उद्यावर मात करण्यासाठी येशु ख्रिस्तावर अवलंबुन राहा, ज्याला भविष्य माहित आहे. येशु ख्रिस्तावर ३६५ दिवस अवलंबुन राहा, नेहमी येशु ख्रिस्ताला अनुसरण्यासाठी तुम्ही तुमच्या गुडघ्यावर या.....



अवलंबुन राहा...

तुमचे ओझे परमेश्वरावर टाका एवढेच तुमचा भाग आहे.

तुमचा हा भाग म्हणजे प्रार्थना करणे.

गुडघे टेकणे हा तुमचा सहभाग आहे.

तूमच्या मेंढपाळाला हाक मारणे हा तुमचा सहभाग आहे. तो म्हणतो, मी उत्तम मेंढपाळ आहे.

कोणतीही व्यक्ति प्रभू येशूच्या नावात उत्तम मेंढपाळाला हाक मारू शकते.

३६५ दिवस, ३६५ सकाळ, ३६५ पहाटेच्या प्रार्थना, ३६५ आशिर्वादित दिवस.

अनेक विषारी बाणांचा सामना करावा लागेल परंतू तो तुमची ढाल होईल.

ते जे आपले जीवन पुढे घेऊन जातात व पुर्णपणे परमेश्वरावर अवलंबुन राहतात...

एक्झिक्युटीव्ह डायरेक्टर यांजकडून!

ख्रिस्तातील प्रियजनहो,

प्रभू येशूचा पिता परमेश्वर हयाची कृपा व शांती आपणा सर्वांबरोबर असो जो आम्हाला त्याची मोठी सांत्वना देतो. त्या त्रैक्य देवाला मी धन्यवाद देतो ज्याने आम्हाला हा संपुर्ण महिना पुर्ण करण्यासाठी शक्ती व सामर्थ्य पुरवले आम्ही आमच्या वैयक्तिक, कौटूंबिक व सेवेतील जिवनाद्वारे ही साक्ष देतो की आमचा पिता हा आमचा घरधनी आहे. आणि तो आमच्या बरोबर सदोदित आहे प्रत्येक सकाळी त्याची कृपा नव्याने होते. आणि त्याच्या चरणाजवळ बसुन आम्ही खुप काही शिकतो त्याचा मंद आवाज आमच्या कानी नेहमी पडतो.

उदयासुध्दा परमेश्वरावर अवलंबुन राहाः

कशाविषयीहि चिंताक्रांत होऊ नका तर सर्व गोष्टीविषयी प्रार्थना व विनंती करून आभार प्रदर्शनासह आपली मागणी देवाला कळवा, म्हणजे सर्व बुध्दिसामर्थ्याच्या पलीकडे असलेली देवाने दिलेली शांति तुमची अंतःकरणे व तुमचे विचार ख्रिस्त येशूच्या ठायी राखील– फिलीप्पे. ४:६–७

चला आपण कूठल्याही प्रकारची चिंता न करता भोजन, कपडा आणि जागा हया सर्वासंबंधी त्याच्यावर अवलंबुन राहु परंतू आपले पवित्र जीवन आपण पुढे घेवून जाउ मी देवाच्या उत्पत्तीतील सर्वामधील एक सूंदर कलाकृती आपण आहोत.

हे आपण विसरू नये एक कूटूंब म्हणुन आपण पूर्णपणे त्याच्यावर अवलंबुन राहु या. मत्तय ६:२५–३४ हे सत्य आहे तुमच्या सर्व भौतिक गरजा पुर्ण होतील आणि त्यात अजुन भर पडेल. ज्याने आपल्या स्वतःच्या पुत्रास राखून न ठेवता त्याला आपणा सर्वांकरिता समर्पण केले, तो त्याच्याबरोबर आपल्याला

सर्व काही कसे देणार नाही? – रोम. ८:३२

तुमच्या सर्व मार्गात तुम्ही परमेश्वरावर अवलंबुन राहाः

परमेश्वरावर अवलंबुन राहणे म्हणजे स्वतःच्या ताकदीवर अवलंबुन राहणे नव्हे. आर्थिक आणि हुद्दा याद्वारेच नव्हे परंतू संपुर्ण हृदयाने अवलंबुन राहणे जेव्हा आमच्यावर असहय अशा समस्या येतात त्याही वेळेस त्याच्या वचनाचा आधार घेवून आम्ही पुर्णपणे त्याच्यावर भिस्त ठेवावी म्हणजे प्रत्येक समस्यातुन आमचा मार्ग निघेल. प्रार्थनेमध्ये आम्ही नेहमी त्याच्या अभिवचनाची आठवण करणे आवश्यक आहे. त्याच्या मार्गदर्शनावर आम्ही अवलंबुन असणे महत्वाचे आहे, म्हणजे देवाच्या सर्व योजना आमच्यासाठी आशिर्वादित अशा होतील.(स्तोत्र २०:६-८, ६२:१-२, ११२:१,७,८, निर्गम ३३:१४)

सुवार्तेसाठी देवावर अवलंबुन राहाः

आम्ही हया वर्षाची योजना आखली आहे की ६०० सेवकांच्या द्वारे ३००० नवीन गावांमध्ये पोहचणे आमच्या दर्शन योजनेनूसार आम्हाला एक लाख गावामध्ये २०३० पर्यंत सुवार्ता घेवून जायची आहे. जेथे ख्रिस्ताचे नाव कोणाला ठाउक नाही त्या गावात आम्हाला पोहचायचे आहे. विश्ववाणी सेवकार्य ही पूर्णपणे भारतीय विश्वासणाऱ्यांच्या प्रार्थनेवर व दानदेणग्यावर अवलंबुन आहे. म्हणुन आम्ही पुर्णपणे देवावर अवलंबुन आहोत.

हया आर्थिक वर्षात आम्ही २०० सेवक सेवाक्षेत्रामध्ये पाठवले आहेत. १०० सेवकांचे प्रशिक्षण आम्ही पुढे ढकलले आहे कारण हया वाढत्या महामारीमुळे. ३०० एज्रा आम्ही शोधुन ठेवले आहे ज्यांची निवड करून प्रभूच्या मार्गदर्शनाने आम्ही त्यांना प्रशिक्षणासाठी पुढे पाठवणार आहोत हयामुळे आम्हाला ही संधी मिळत आहे की नवीन असंपर्कित ३००० गावामध्ये सुवार्ता पोहचावी.

आम्ही आर्थिक बाबींसाठी परमेश्वरावर पुर्णपणे अवलंबुन आहोत की विश्वासणारे लोक पुढे येतील आणि साहाय्य करतील. परमेश्वर आमच्या दररोजच्या गरजा पुर्ण करत आहे त्याबद्दल परमेश्वराचे आम्ही गौरव करतो. सेवेतील आपला वाटा हा आमच्यासाठी सर्वात महत्वाचा आहे. तुमच्या साहाय्याबद्दल आम्ही परमेश्वराचे आभार मानतो, प्रभू आपणास आशिर्वादित करो.

विकास कार्य आणि प्रशिक्षण केंद्रः

आम्ही आमच्या दर्शनाकडे वाटचाल करत आहोत त्याच वेळेस आम्हाला हया दर्शनाकडे पोहचण्यासाठी साधणाची गरज आहे. उत्तर भारताच्या सेवाकार्यासाठी आम्हाला दिल्ली येथे स्वतःच्या कार्यालयाची गरज आहे. महाराष्ट्राच्या दर्शन योजनेसाठी आम्हाला मुंबईमध्ये स्वतःच्या कार्यालयासाठी जागा आवश्यक आहे.

तसेच विकास कामासाठी कोईम्बतुर मध्ये आम्हाला स्वतःच्या कार्यालयाची गरज आहे. त्याचप्रमाणे कन्याकूमारी तिरूवेल्ला, टूटिकूरीन, त्रिची, मध्य चेन्नई आणि इतर राज्यासाठी जर प्रभू तुम्हाला स्वतःची जागा किंवा इमारत हया कार्यासाठी देण्यास पुढाकार करत असेल तर कृपया आपण पुढे या. तुमची

वचनबध्दता आमच्या सेवेसाठी मोठे कार्य करेल व तुमचे ही नाव त्या जीवनाच्या पुस्तकात लिहिले जाईल तुमचे कार्य आणि तुमचे भविष्य सुध्दा आशिर्वादित होईल.

कोविड मदत कार्यः

प्रभूची मोठी कृपा आणि प्रार्थनापुर्वक घेतलेले ओझे महामारीमुळे जे कूटूंब प्रभावित झाले त्यांना सांत्वना देवून ते हळुहळु प्रभुमध्ये स्थिरावत आहे. ज्यांचे प्रियजन हया महामारीमध्ये प्रभुकडे गेले आहेत त्यांच्यावर प्रभु विशेष कृपा करो ही आमची प्रार्थना आहे. आम्ही विश्ववाणी द्वारे त्यांच्या कूटूंबियांना मदतीचा हात देत आहोत. अनेक आमचे भागीदार हयासाठी पुढे आले आहेत.

सध्या ही मदत आम्ही जम्मु काश्मिर, हिमाचल, पंजाब, उत्तराखंड, दिल्ली, झारखंड, छत्तिसगढ, गुजरात साहाय्य मदत कार्य अजुन उरलेल्या राज्यांमध्ये सुध्दा आम्हाला पाठवायची आहे. आम्ही आपणा सर्वांना विनंती करतो की कृपया आपण हया करिता साहाय्य करावे.

विश्ववाणी सेवकांसाठी कल्याणकारी योजनाः

एप्रिल आणि मे महिन्यामध्ये आमचे १० सेवक प्रभुमध्ये विसावले. आजारपणाने ५ सेवकांच्या पत्नीसुध्दा प्रभुकडे गेल्यात. तसेच अनेक सेवक वेगवेगळया आजारपणाला बळी पडले, अनेकांचे अपघात झाले, ऑपरेशन झाले व अनेक महामारीच्या विळख्यात सापडले. ६ लाख २५ हजाराची मदत आजपर्यंत आम्ही या तीन सेवकांना दिली. व ५ लाख ७१ हजार रूपये वैदयकीय मदत वेगवेगळया प्रकारे दिली. हया महिन्यात आम्हाला मागील महिन्यात मृत्युमूखी पडलेल्या सेवकांच्या कूटूंबांना मदत करायची आहे.

आम्ही २८ विधवांना प्रत्येक महिन्याला रू. ५०००/- ची मदत करत आहोत जे विश्ववाणी सेवेदरम्यान मृत्युमुखी पडले. आम्ही ही मदत सोसायटी फॉर केअर ॲन्ड निड हया द्वारे पुरवत आहोत ही सोसायटी गरजवंत व्यक्तीसाठी विश्ववाणीचा एक भाग म्हणुन तयार करण्यात आली आहे. आम्हाला हया कार्यासाठी तुमची सुध्दा गरज आहे. कृपया एक कूटूंब म्हणुन पुढे या व सढळ हस्ते हयास मदत करा.

बचतपेटी, खेडी दत्तक योजनाः

आम्ही हे कबूल करतो की हया महामारीच्या दिवसात आम्ही तुमच्या पर्यंत पोहचु शकत नाही. आपणास विनंती करत आहोत की हया कठीण परिस्थितीत आम्ही आपल्या घरी दान जमा करण्यासाठी येवू शकत नाही. तरी आपण ऑनलाईन द्वारे आपले दान पाठवू शकता.

आम्ही येणाऱ्या दिवसात आपल्या घरी येण्यास तयार आहोत जर आपण त्या प्रकारची परवानगी आम्हाला देत आहात. कृपया तद्संबंधी माहिती आपण आपल्या जवळच्या सेवकांना किंवा स्वंयसेवकांना दयावी. प्रभु आपणास आशिर्वादित करो.

प्रार्थना, रोजचे मनन आणि आत्म्याचा हंगामः

प्रार्थना आणि बायबल वाचणे हे आमच्या शरीरातील दोन डोळयाप्रमाणे आहेत. त्याचप्रमाणे आत्म्याचा हंगाम हा सुध्दा महत्वाचा आहे. विश्वासणाऱ्यांनी लोकांना सार्वकालिक जीवनाच्या वाटेवर जमा करणे आवश्यक आहे. प्रार्थना आणि बायबल वाचणे हे देवावर अवलंबुन असण्या सारखे आहे. आत्म्याच्या हंगामासाठी आम्ही ख्रिस्तात जगणे हे गरजेचे आहे. प्रभूच्या मार्गदर्शनाने आम्ही जुलै महिना हा संपूर्ण प्रार्थनेचा महिना म्हणुन पुन्हा एकदा मागिल वर्षाप्रमाणे पाळत आहोत. प्रार्थना हेच जीवन आहे आणि प्रार्थनेत विजय आहे.

आता आशेचा देव विश्वास ठेवण्यामुळे तुम्हाला संपुर्ण आनंदाने व शांतीने भरो, अशा करिता की, तुम्हाला पवित्र आत्म्याच्या सामर्थ्याने विपुल आशा प्राप्त व्हावी.

– रोम. १५:१३

चेन्नई

१६.०६.२०२१

ख्रिस्तातिल तुमचा बंधु.

डब्ल्यु. विल्सन गॅनकूमार

सतनामी लोकगटातील प्रार्थना मंदीर

छत्तिसगढ मधील कोरबा जिल्हयातील सुहागपुरी सेवाक्षेत्रात देवाचा आत्मा ज्या प्रकारे कार्य करित आहे त्या सर्वांचे आम्ही साक्षी आहोत. प्रभूची स्तूती असो. सातनामी लोकगटात प्रभूचा दास सरबल सारती ज्या कष्टाने सेवा करत आहेत. ज्या ज्या ठिकाणी परमेश्वराचे वचन हया लोकामध्ये पसरत आहे, त्या प्रत्येक घरातील सैतानी बंधने व दुष्ट कार्याचे बंधने सूटत आहेत. आजारपण निघून जात आहे. पापाचे बंधन गळून पडत आहेत जे कोणी त्या पूत्रावर विश्वास ठेवतात त्यांना ती सार्वकालिक मुक्ती मिळत आहे. साक्ष आणि सुवार्ता हया द्वारे हे स्पष्टपणे दिसून येत आहे की परमेश्वराला सर्व काही शक्य आहे.

आणि याचा परिणाम म्हणुन ११ लोक भक्तीगटात सामील झाले. आणि एक प्रार्थना मंदीराची स्थापना दि. १६.०६.२०२१ रोजी सुहागपुर येथे झाली.

प्रभूला गौरव असो. – बंधू. आशिष कूमार

ज्याच्यावर तुम्ही विश्वास ठेवता

त्याच्यावर तुम्ही अवलंबून राहा

प्रिय बंधु आणि भगिणींनो, जे तुम्ही नवीन परिस्थितीत पाउल टाकत आहा, तुम्हाला असे वाटते तुम्ही एका नवीन देशात प्रदेश करत आहात? जे अनोळखी ठिकाणी जातात त्यांना मार्गदर्शकाची, सल्ला देणाऱ्याची आणि काही व्यक्ति ज्या तुम्हाला ओळखतात यांची गरज असते.

त्याचप्रमाणे जेव्हा तुम्ही नवीन परिस्थितीत प्रवेश करता तेव्हा तुम्हाला योग्य मार्गदर्शकाची योग्य सल्ला देणाऱ्याची ज्याच्यावर तुम्ही विश्वास ठेवू शकता अशा व्यक्तिची गरत असते. प्रत्येक नवीन सकाळचा सामना करण्यासाठी तुम्हाला योग्य मार्गदर्शनाची गरज असते. नवीन आशीर्वाद मिळवण्यासाठी नवीन सामर्थ्याची गरज आहे.

हया नवीन परिस्थितीत तुमचे आयुष्य कसे जाणार आहे? त्याची योजना कोण करणार आहे? तो आहे, ज्याच्यावर तुम्ही विश्वास ठेवता. ज्याला तुम्ही तुमचा मार्गदर्शक, सल्ला देणारा, आणि जोडीदार म्हणुन निवडता, तोच फक्त तूमच्या जीवनाची दिशा ठरविणारा ठरेल, हया नवीन परिस्थितीत काही लोक ज्योतिष शास्त्रावर विश्वास ठेवतात, किंवा दिनदर्शिकेवरील ग्रह, ताऱ्यांच्या वेळेवरुन चांगले किंवा वाईट होणार हे बघतात. असे लोक ताऱ्यांच्या स्थितीची त्यांच्या जीवनाशी तुलना करतात. असे लोक ज्योतिषाकडे किंवा व्यक्तिंकडे धावतात किंवा स्वतःवरच विश्वास ठेवतात.

हया पृथ्वीवरील प्रत्येक व्यक्ति कशावर तरी विश्वास ठेवते आणि त्याच्या जीवनाची दिशा ठरवतो. ज्याच्यावर आपण विश्वास ठेवतो त्याच्यावर आपण विश्वास ठेवतो. हया पृथ्वीवर कोणतीही व्यक्ति कोणावर तरी विश्वास ठेवल्याशिवाय जगत नाही. प्रश्न हा आहे, तुम्ही कोणावर विश्वास ठेवता?

पुष्कळ मनुष्ये माणसावर अवलंबुन असतात. परंतु मनुष्याला त्याचे भविष्य कसे असेल हे माहित नसते. प्रगतीसाठी इतरांना खुष करणे माणसांना ठाउक आहे. परंतु त्याला मनुष्याला दुसऱ्या व्यक्तिची प्रगती करण्याचे सामर्थ्य नाही.

का? मनुष्याला व्यक्तित्व सर्व काही समजण्याचे नाही किंवा तो सर्वसमर्थ नाही. यशया २:२२ मध्ये सांगितले आहे, मनुष्यावर भरवसा ठेवू नका, त्याचा श्वास त्याच्या नाकपुडयात आहे त्याला काय जमेस धरावयाचे?

कोणत्याही परिस्थितीत कोणी तुम्हाला मार्गदर्शन करत असेल तर ती व्यक्ती सर्व समजण्यांची ज्ञान असणे आवश्यक आहे. अंदाज वेगळे असतात. ज्ञान वेगळे आहे. मनूष्याला भविष्यातील अंदाज करणे माहित आहे किंवा भविष्यकाळ काय घडेल हयाचे अंदाज करणे माहित आहे परंतू तो असेच घडेल हे निश्चितपणे सांगु शकत नाही.

तो एक कोण आहे, ज्याला सर्व माहित आहे? सर्व समजण्याचे ज्ञानाशिवाय तो सर्वसमर्थ असणे आवश्यक आहे, मनुष्याला सर्व समजण्याचे ज्ञान आवाजावर विश्वास ठेवू नका परमेश्वरावर विश्वास ठेवा. २३ स्तोत्राचा लेखक म्हणतो, परमेश्वर माझा मेंढपाळ आहे. आधी नम्रता, नंतर मान्यता जगाच्या इतिहासांत अनेक राजे, राण्या, पुढारी, कलावंत, श्रीमंत मनुष्य आणि प्रतिष्ठित व्यक्ति आपण बघतो– त्या सहज जग सोडून गेल्या. हया व्यक्तिंवर विश्वास ठेवू नका, ज्यांच्या जन्म होतो आणि त्या नष्ट होतात. त्याच्यावर विश्वास ठेवा, जो काल, आज, आणि युगानुयुग बदलत नाही. कदाचित तुम्हाला

आत त्रास, बाहेर त्रास घरी अनिश्चितता, बाहेर समस्या, शरीराची अशक्तता, कामाचे ओझे, कमी उत्पन्न, अधिक गरजा– कदाचित तुमच्या आयुष्यात प्रत्येक दिवशी एका मागून एक येतील. परंतू तो एक, जो तुमचा निर्माणकर्ता आहे प्रत्येक गोष्टीचा ताबा घेईल. तुमचे ओझे परमेश्वरावर टाका एवढेच तुमचा भाग आहे. तुमचा हा भाग म्हणजे प्रार्थना करणे.

गुडघे टेकणे हा तुमचा सहभाग आहे. तूमच्या मेंढपाळाला हाक मारणे हा तुमचा सहभाग आहे. तो म्हणतो, मी उत्तम मेंढपाळ आहे. कोणतीही व्यक्ति प्रभू येशूच्या नावात उत्तम मेंढपाळाला हाक मारू शकते.

३६५ दिवस, ३६५ सकाळ, ३६५ पहाटेच्या प्रार्थना, ३६५ आशिर्वादित दिवस. अनेक विषारी बाणांचा सामना करावा लागेल परंतू तो तुमची ढाल होईल.

जेव्हा तुम्ही पेत्राप्रमाणे हया जीवनाच्या सागरात वाहत जाल, तो तुम्हाला त्याच्यावर चालवल. जेव्हा तुम्ही जलातुन जाता तेव्हा तुमचा मेंढपाळ तुम्हाला त्याच्या खांद्यावर घेईल.

जेव्हा तुम्ही नदयांतून जाल, तेव्हा तो तुम्हासाठी होडी होईल. जेव्हा तुम्ही अग्नीतुन जाल तेव्हा अग्नीज्वाला तुम्हास पोळणार नाही असे तो करील.

एक प्रार्थना

जो तु, काल, आज,आणि युगानुयुग बदलत नाही जो तु, दिनदर्शिका, वेळ आणि घडयाळे यापेक्षा वेगळा आहेस ज्या तु आदि आणि अंत कळत नाही.

जो तु माझ्या आयुष्याला दिवस, महीने आणि वर्ष जोडतो, परमेश्वरा मी कबुल करतो,

हया नवीन वर्षात मी एक ही दिवस माझ्या स्वतःच्या इच्छेने चालणार नाही. मी जाहिर करतो, मला बुध्दी आहे, परंतू माझ्या दैनंदिन जीवनात मी योग्य निर्णय घेवू शकत नाही. मी हे सुध्दा जाहिर करतो,

जरी मला आईवडील आहेत, नातलग, मित्र मैत्रिणी आणि इतर लोक आहेत तरी, जय फक्त परमेश्वराठायी आहे.

तु स्वतः हया परिस्थितीतुन मला बाहेर काढ, माझे हृदय तुझे ओझे घेवो आणि तु माझे ओझे घे.

जरी पृथ्वी थरथर कापली, समुद्र उसळला काही झाले तरी मी भिणार नाही, कारण तू माझ्या बरोबर आहेस.

तू सैतानावर जय मिळवला, तु हे सर्व दिवस माझे ओझे वाहिले.

तु एकटा माझ्यासाठी पुरेसा आहे, येशु ख्रिस्ताच्या नावात आमेन...

नेटवर्क अध्यक्षांकडून...

तारणाऱ्या येशु ख्रिस्ताच्या प्रेमळ नावात आपणा सर्वांना प्रेमपुर्वक सलाम.

सेवक हे हंगामातील सह-कामगार हे ख्रिस्तासाठी आत्मे जमा करणारे असतात.

पिता परमेश्वराची कृपा व शांती नेहमी आपणा बरोबर असो. हया दिवसात जेव्हा-जेव्हा आम्ही तंत्रज्ञान साधनांकडे पाहतो रोज कुठे न कुठे आम्हाला मृत्युच्या बातम्या ऐकायला मिळतात. मृत्युच्या हया काळोखात आम्हाला विलाप ऐकायला मिळतो. हया दिवसात आमच्या बरोबर सेवा करणाऱ्या अनेक प्रियजनांचे मृत्यु आम्ही पाहिले आमच्यासाठी ते एक मोठे नुकसान होते.

पुर्वी आम्ही महिन्यातुन एखादया अशा बातम्या ऐकायचे परंतू आजकल प्रत्येक दिवशी हे ऐकायला मिळते. आमच्या मधुन कोणीतरी गेले हे ऐकायला आता कसेतरी होते हे कानाला ऐकू नये असे वाटते परंतू हळुवार पणे कुठून तरी हे शब्द कानावर पडतात.

महत्वाचा संदेश हाच आहे की हे आम्हा मनुष्य प्राण्याला शिकवते की आम्हालाही एक दिवस तेथे जायचे आहे. महामारीच्या हया दुसऱ्या लाटेमध्ये, अनेक माध्यमाच्या द्वारे आम्हाला ऐकायला मिळते. उत्तर प्रदेश आणि बिहार येथुन अनेक मृत शरीर गंगा नदीत फेकले जाते. त्यांच्या विश्वास आहे की, त्या व्यक्ति हयाद्वारे एकदम कैलास पर्वतावर पोहचतात आम्हाला हया गोष्टीबद्दल विचार करण्याची गरज आहे.

प्रत्येक धर्मातिल व्यक्तिला हे समजणे आवश्यक आहे की मृत्युनंतर व्यक्ति कुठे जातात. हया भुतलावरील आपले जीवन मर्यादित आहे. आज हे जग अनंतकालीन जिवन शोधत आहे. आणि हे सत्य आम्ही नाकारू शकत नाही. पवित्र शास्त्र अनंत जीवनाचा उल्लेख योहान ३:१६ मध्ये करते- देवाने जगावर एवढी प्रीति केली की, त्याने आपला एकुलता एक पुत्र दिला, अशासाठी की, जो कोणी

त्याच्यावर विश्वास ठेवतो त्याचा नाश होऊ नये तर त्याला सार्वकालिक जीवन प्राप्त व्हावे.

करोडो लोक आज आपण पाहतो की हया वचनाद्वारे त्याने अनंतकालीन जीवनाचा अनुभव प्राप्त करून घेतला आहे. देव जो पिता त्याने हया जगावर एवढी प्रीति केली आहे की त्यासाठी त्याने आपला एकुलता एक पुत्र प्रभू येशू ख्रिस्त हया जगासाठी दिला जो कोणी प्रभू येशू ख्रिस्तावर विश्वास ठेवतो त्याच्या ठायी सार्वकालिक जीवन आहे. प्रभू येशूच फक्त मनुष्याला वाचवु शकतो व सार्वकालिक जीवन देवू शकतो.

प्रेषितांचे कृत्ये- आणि तारण दुसऱ्या कोणाकडून नाही, कारण जेणेकरून आपले तारण होईल असे दुसरे कोणतेही नाव आकाशाखाली मनुष्यांमध्ये दिलेले नाही. जेव्हा मनूष्य हया भूतलावर आपले नेत्र बंद करतो तेव्हा त्याचा प्रवास स्वर्गाकडे किंवा नरकाकडे असतो. पवित्रशास्त्र अगदी स्पष्टपणे आम्हाला हया बद्दल सांगते की, स्वर्गाकडे जाणारे लोक त्या स्वर्गात किती आनंद व सूख सार्वकालिक प्राप्त करतात व नरकाकडे जाणारे लोक त्यात सार्वकालिक विलाप व दुःख करतात जेथे ओरडणे व दात खाणे असते.

प्रभू येशू फक्त स्वर्गाकडे जाणारा मार्ग आहे. योहान १४:६- येशुने त्याला म्हटले, मार्ग, सत्य व जीवन मीच आहे, माझ्याद्वारे आल्यावाचुन पित्याकडे कोणी येत नाही. हया जगामध्ये जितके दिवस आपण व्यतिथ करणार आहोत तेवढया दिवसामध्ये आम्ही ही घोषणा करणे आवश्यक आहे. की येशू हाच स्वर्गाचा मार्ग आहे. विश्ववाणी सेवाकार्य हे महान कार्य करत आहे, सुवार्तेची घोषणा त्यांना ज्यांना अजूनही ही आनंदाची माहिती नाही.

सुवार्ता कार्य- ही आमचा देव जो पिता हयाची इच्छा आहेः

२ तिमथी २:३४-ख्रिस्त येशूचा चांगला शिपाई हया नात्याने माझ्याबरोबर दूःख सोस. ४. शिपाईगिरी करणारा माणूस संसाराच्या कार्यात गूंतत नाही, हयासाठी की, ज्याने त्याला सैन्यात दाखल करून घेतले त्याला त्याने संतूष्ट करावे. सूवार्ता कार्यः प्रभू येशुची ही आज्ञा आहे.

मत्तय २८:१८-२०- तेव्हा येशू जवळ येऊन त्यांच्याशी बोलताना म्हणाला, स्वर्गात आणि पृथ्वीवर सर्व अधिकार मला दिलेला आहे. १९. तेव्हा तुम्ही जाऊन सर्व राष्ट्रांतील लोकास शिष्य करा, त्यास पित्याच्या, पुत्राच्या व पवित्र आत्म्याच्या नावाने बाप्तिस्मा द्या. जे काही मी तुम्हाला आज्ञापिले ते सर्व त्यांस पाळावयास शिकवा, आणि पाहा, युगाच्या समाप्तीपर्यंत मी सर्व दिवस तुमच्याबरोबर आहे.

सुवार्ता कार्यः पवित्र आत्म्याद्वारे मार्गदर्शन आहे. प्रेषित. १६:९-१० तेथे रात्री पौलाला असा दृष्टांत झाला की, मासेदोनियाचा कोणीएक माणूस उभा राहुन आपणाला विनंती करीत आहे की, इकडे मासेदोनियांत येऊन आम्हाला साहाय्य कर. १०. त्याला असा दृष्टांत झाल्यानंतर त्या लोकांना सुवार्ता सांगावयास देवाने आम्हाला बोलाविले आहे असे अनुमान करून आम्ही मासेदोनियात जाण्याचा लागलाच विचार केला. पवित्र शास्त्र हे स्पष्टपणे निर्देशास आणून देते की, जे लोक मृत्युकडे वाटचाल करत आहे. त्यांच्यासाठी सुवार्ता ही किती महत्वाची आहे.

आणि स्वर्गीय आशिर्वाद किती आवश्यक आहे. आमच्या जवळपास असणाऱ्या लोकांना हे समजणे

आवश्यक आहे येशु ही मार्ग आहे आणि येशु ही प्रभु आहे व तोच एक मार्ग सार्वकालिक जीवनासाठी आहे. सर्व विश्वासणाऱ्यांचे काम आहे की, त्यांनी हयासाठी प्रार्थना करावी. हे ओझे घ्या आणि इतरांना हे सांगा की येशु हाच तारणारा आहे.

आम्ही हे पाहु शकत नाही हया प्रकारचे भयानक मृत्यु हे सर्व काही आपल्याला हेच दर्शविते की, प्रभू येशु पुन्हा येणार आहे. त्याचे पहिले येणे हे ऐतिहासिक सत्य होते त्याचप्रमाणे त्याचे दुसरे येणे हे ऐतिहासिक वास्तव्य आहे. १ इतिहास १२:३२ – कालप्रवृत्ति ओळखुन इस्त्राएलाने काय करावे हे ज्यांना कळत होते असे इस्साखार वंशातील दोनशे नायक आले, त्यांचे सर्व भाऊबंद त्यांच्या आज्ञेत होते. आम्ही ही कठीण परिस्थिती समजून घेतली पाहिजे आणि सुवार्तेच्या कार्याला महत्व दिले पाहिजे. ही आम्हा सर्वांसाठी अत्यंत निकडीची गरज आहे.

आमचे दर्शन आहे १,००,००० गावापर्यंत पोहचणे. आम्हाला एक लाख कूटूंबांची आवश्यकता आहे जे हया दर्शनावर विश्वास ठेवून प्रार्थना करतील व २०,००० सेवकांना हया कार्यासाठी मदतीचा हात देतील. हया महत्वाच्या कामासाठी विश्वासणाऱ्यांची महत्वाची गरज आहे. आम्हाला स्वंयसेवकांची सुध्दा तेवढीच गरज आहे जे आमच्या सेवकांच्या खांद्याला खांद्या जोडून हया सेवाकार्यामध्ये विश्वासाणे उतरतील आणि भारतीय लोकांना येशुचे नाव कळण्यासाठी साहाय्यक म्हणुन हया सेवेला हातभार लावतील आम्ही प्रेमळपणे त्या सर्व स्वंयसेवकांचे स्वागत करू इच्छितो जे सुवार्तेच्या हया महान कार्याचे महत्व आणि वेळेची किंमत जाणतात.

तूमचे लहान कार्य हया देशामध्ये महान काम करू शकेल. आम्ही सर्व जण मिळून सार्वकालिक राज्यासाठी प्रार्थना करू या. विश्ववाणीच्या कार्यासाठी स्वंयसेवक म्हणून पुढे या तुमची इच्छा आम्हाला कळवा किंवा आमच्या विश्ववाणी सेवकांना संपर्क करा.

प्रभू तुमच्या हया महान कार्याला आशिर्वादित करो.

(कारण तुझ्या सर्व मार्गांत तुझे रक्षण करण्याची तुझ्याविषयी तो आपल्या दिव्यदूतांना आज्ञा देईल,)

स्तोत्र. ९१:११

हैद्राबाद

१६.०३.२०२१

त्याच्या सेवतील

पि. सेल्वराज अन्नन

चेअरमन, विश्ववाणी नेटवर्क

हिज्कीया

(यशया ३६,३७ अध्याय वाचा. ही चर्चा एक फुशारक्या मारणाऱ्या व्यक्ति आणि हिज्कीया यांच्यामध्ये चालली आहे. हिज्कीया पूर्णपणे परमेश्वरावर अवलंबून जीवन जगत होता.)

फुशारक्या मारणारी व्यक्ती: मला ज्ञान देण्याऐवजी आणि माझ्या अधीन होण्याऐवजी तुम्ही माझा अपमान केला आणि वैर दाखवले. कोणावर तुम्ही विश्वास ठेवला?

हिज्कीया आणि लोक: शांत राहिले, उत्तर दिले नाही.

फुशारक्या मारणारी व्यक्ती: जर तुम्ही म्हणाल– तुम्ही परमेश्वरावर विश्वास ठेवला आहे. हे लक्षात ठेवा फक्त परमेश्वराने सांगितले म्हणून मी येथे आलो आहे. मी सांगतो त्यावर विश्वास ठेवा.

हिज्कीया आणि लोक: शांत राहिले, उत्तर दिले नाही.

फुशारक्या मारणारी व्यक्ती: हे हिज्कीया, तु विश्वास ठेवतो परमेश्वर निश्चित तुझा बचाव करील. तुझ्या लोकांना मी सांगतो हिज्कीयावर विश्वास ठेवू नका आणि त्याच्या परमेश्वरावर विश्वास ठेवू नका. तूमची दाने घेवून या, आणि आमच्या पाया पडा.

हिज्कीया आणि लोक: शांत राहिले, उत्तर दिले नाही.

हिज्कीयाने फुशारक्या मारणाऱ्यांना उत्तर न देण्याचा निर्णय घेतला. यशया ३६:२१

फुशारक्या मारणाऱ्या व्यक्तिची हिज्कीया बरोबर तुलना होवू शकत नव्हती. हिज्कीया पेक्षा जगाच्या दृष्टीने तो महान होता. कोणालाच त्याला विरोध करण्याची हिम्मत नव्हती.

त्याचा नाश करू शकेल अशी व्यक्ती नव्हती. जरी फुशारक्या मारणाऱ्याने हिज्कीया आणि त्याच्या परमेश्वराच धिक्कार केला. उघड थट्टा केली आणि असभ्य बोलला. तरी हिज्कीयाने आपले मानसिक स्थैर्य सोडले नाही.

परिणाम काय झाला? एक चमत्कार झाला. परमेश्वराचा दुत फुशारक्या मारणाऱ्या व्यक्तिच्या सैन्यात गेला आणि त्याने १,८५,००० सैनिकांचा वध केला. फुशारक्या मारणारी व्यक्ती निसटून गेली आणि जेव्हा तो त्याच्या दैवतासमोर उभा होता त्याच्या दोन पुत्रांनी येवून तरवारीने त्याचा वध केला.

– यशया ३७:३६–३८

फूशारकी मारणारी व्यक्ती स्वत:वर विश्वास ठेवत होता– त्याची कधीच उन्नती झाली नाही. परंतू नितीसुत्रे २८:२५ मध्ये सांगितले आहे, जो परमेश्वरावर विश्वास ठेवतो त्याची उन्नती होईल.

देवाचा सेवक रोज सकाळी देवाच्या चरणाजवळ सापडला पाहिजे त्याची पहाट येशु बरोबर असणे गरजेचे आहे. दिवसभराची सर्व योजना त्याने येशुला सांगितली पाहिजे प्रार्थना केल्याविना केलेली सेवा ही निरर्थक असते. ज्या व्यक्तिंना आम्हाला सुवार्ता सांगायची आहे. त्या व्यक्तिंना आम्ही येशुकडे प्रार्थनेत ठेवणे आवश्यक आहे. प्रार्थना हयाचा अर्थ देवाबरोबर बोलणे.

देवाने घडविलेला मनुष्य आदाम हयाबद्दल पवित्र शास्त्रामध्ये आम्हाला कुठेही दिसत नाही कि, तो प्रार्थना करत होता हयासाठी की, एदेन बागेत देव स्वतःत्याच्याबरोबर फिरत असे उत्पत्ती ३:८ परंतु पवित्र शास्त्रामध्ये उत्पत्तीच्या पुस्तकात ५:२६ हया वचनात आम्हाला दिसते की, आदामाचा नातु अनोश हयाच्या काळापासुन लोक परमेश्वराच्या नावाने प्रार्थना करू लागले. पुढे संपुर्ण पवित्र शास्त्र आम्हाला प्रार्थनेच महत्व पटवुन देते.

हनोख नावाच्या व्यक्तिबद्दल पवित्र शास्त्र आम्हाला सांगते उत्पत्ती ५:२१ए २३ हनोख ६५ वर्षाचा झाल्यावर त्याला मथुशलह झाला, मथुशलह झाल्यावर हनोख तीनशे वर्षे देवाबरोबर चालला हनोखाचे एकंदर आयुष्य ३६५ वर्ष होते. हनोख देवाबरोबर चालला त्यानंतर तो नव्हता कारण देवाने त्याला नेले.

हनोख ३०० वर्ष रोज प्रार्थना करत असे एवढेच नव्हे तर तो रोज देवाबरोबर चालत असे आणि म्हणुन देव एकदा हनोखाला म्हणाला हया भुतलावर तु ३०० वर्ष माझ्याबरोबर चालला आता हयापुढे मी तुझ्याबरोबर सदा सर्वदा चालेल आणि म्हणुन हनोखाला मरणाचा अनुभव आला नाही. त्याला परमेश्वराने सदेह स्वर्गात नेले.

हया भुतलावर सर्वात जास्त वर्षे जगलेला मथुशलह नावाचा व्यक्ती होता ज्याचे वय- ९६९ होते. उत्पत्ती ५:२६ जो हनोखाचा मुलगा होता. दीर्घ आयुष्य देवाने दिलेला आशिर्वाद होय हनोखाच प्रार्थनामय जीवन त्याच्या पुढील पिढीसाठी मोठया आशिर्वादाच ठरल.

नोहाची प्रार्थनामय सेवा त्याला नितीमान व सात्विक ठरवून गेली. देवाने जी सेवा त्याला दिली त्या काळात कुठलेही आधुनिक साहित्य नसताना त्याने देवाने ज्या प्रकारे सांगितले त्या प्रकारे तारू बांधले आब्राहामाने प्रार्थना पुर्वक परमेश्वराचा आदेश मानून माहित नसलेल्या देशाकडे कुच केली व परमेश्वराने त्याची सेवा आशिर्वादित ठरवली.

याकोब, योसेफ, मोशे, दाविद, दानिएल, अनेक महान नाव आम्हाला जून्या करारात पवित्र शास्त्रामध्ये दिसून येतील ज्यांनी प्रार्थनेद्वारे महान कार्य केले अब्राहाम, मोशे हयांना देवाचा मित्र म्हटल्या गेले. प्रार्थनेद्वारे शद्रक, मेशख, अबेदनगो तप्त भट्टीत ही फिरत होते. प्रार्थनेद्वारे दानिएल सिंहाच्या गुहेत त्या सिंहासमोर शांत निद्रा घेत होता. योनाने माशाच्या पोटात पश्चातापाची प्रार्थना केली व नंतर त्याला दिलेली सेवा त्याने पुर्ण केली. प्रभू येशूने आपल्या शिष्यांना प्रथम शिकवली व नंतर सेवेत पाठवले.

प्रार्थनामय सेवेचे उत्तम उदाहरण स्वतः आमचा प्रभु येशू ख्रिस्त आहे ज्याने आपल्या सेवेची सुरूवात ४० दिवस उपवास आणि प्रार्थनेने केली. प्रेषितांची कृत्ये हे पुस्तक आम्हाला प्रार्थनेविषयी आणि सेवेविषयी अधिक प्रमाणात शिकवते पेत्र आणि योहान हयांची प्रार्थनामय सेवेची सुरूवात अधिक कार्ये करण्यास प्रबल झाली.

पेत्राच्या संदेशाने तिन हजार लोकांनी प्रथम बाप्तिस्मा घेतला नंतर पाच हजार लोकांनी व नंतर अनेकांनी हे त्या प्रार्थनेचे उत्तर आणि फळे होत. ज्यासाठी त्याने अनेक दिवस गुडघे टेकून ही सेवा प्राप्त करून घेतली पेत्राने प्रार्थनेद्वारे आरोग्य देण्याची सेवा केली. आणि अनेक जणांना आरोग्य प्राप्त झाले. स्तेफनाची प्रार्थनामय सेवा अनेकांना तारण देणारी ठरली व हया देवाच्या भक्ताला लोक दगडमार करत असताना मरणाच्या शेवटच्या घटकेला तो स्वर्ग उघडलेला पाहतो.

देवाच्या एका सेवकाने असे म्हटले कधी कधी आम्ही एवढी सेवा करतो एवढी धावपळ करतो की, ज्याची सेवा करतो त्यालाच विसरून जातो.

सेवकाची प्रार्थनामय सेवाः

देवाचा सेवक हा सर्वसाधारण व्यक्ती सारखा नसतो कारण देवाने त्याला निवडून त्याची सेवा त्याच्या हातात दिलेली असते. तो लोकांसाठी आणि सेवेसाठी २४ तास उपलब्ध असतो तो वेळेच्या बंधनात नसतो आणि म्हणुन जर त्याने प्रार्थना न करता सेवा केली तर त्याची सेवा निरर्थक असते.

अधिक सेवा अधिक प्रार्थना हे त्याचे ध्येय असणे गरजेचे आहे. त्याच्या जीवनाची सकाळ ही येशूबरोबर असणे गरजेचे आहे.

कारण दिवसभर त्याला एक महान कार्यासाठी बाहेर पडायचे आहे, महान योजना त्याला बनवायची आहे आणि ती म्हणजे गर्जणाऱ्या सिंहाच्या तावडीतुन अनेक आत्म्याच्या बचाव करणे दाविदाने शमशोनाने सिंहाचे जबडे फाडून टाकले होते. एवढी शारीरिक ताकद त्यांच्यात होती परंतू प्रार्थनेविना दावीद बथशबेच्या आणि शमशोन दलिलाच्या पुढे निरर्थक ठरले.

तोच दावीद पुढे स्तोत्र ५१ मध्ये शुध्दतेसाठी प्रार्थना करतो. आज हे जग सैतान आणि त्याच्या कृत्यांनी भरलेले आहे आणि म्हणुन आम्हाला त्याच्यापुढे टिकाव धरता यावा म्हणुन ही सेवा प्रार्थनामय असणे अत्यंत गरजेचे आहे.

आम्ही आमच्या आजच्या दिवसाची योजना तयार करावी कूठे जायचे आहे? कोणत्या व्यक्तीला भेटायचे आहे? काय कार्य करायचे आहे? व पहाटेच ही सर्व योजना आम्हाला त्या निर्माणकर्त्याच्या हातात दयायची आहे व नंतर पुढे त्या योजनेप्रमाणे सेवा पुढे करायची आहे.

निश्चितच आमच्या सर्व योजना प्रभू आशिर्वादित करेल. ज्या ठिकाणी किंवा ज्या गावात जास्त सेवा असते किंवा जास्त प्रतिसाद दिसुन येतो त्या ठिकाणी सैतान व त्याचे सैन्य हयांचे जास्त लक्ष असते व त्यामुळे अनेक अडखळ सेवेत येतात.

आर्थिक अडचणी, स्थानिक लोकांद्वारे येणाऱ्या अडचणी, विरोध, कोर्ट कचेऱ्या हया सर्व अडचणीमूळे व्यक्ती एवढा व्यस्त होतो की, हळुहळु त्याचे प्रार्थनामय जीवन संपूष्टात येते तसे पाहता जास्त अडखळण जास्त प्रार्थना हा नियम आम्हाला पवित्र शास्त्रात दिसून येतो.

अडखळणामध्ये आम्ही जास्त वेळ प्रभू बरोबर असावे त्याला हया सर्व अडखळणावर मात करण्यास सांगावे तो सर्व मार्ग मोकळे करेल. चांगला वेळ आम्ही प्रभू येशूसाठी काढणे गरजेचे आहे ज्या वेळेमध्ये मी आणि माझा प्रभू असेन.

प्रार्थनेचा क्रमः

अनेकदा आम्ही कशी प्रार्थना करावी हेच आम्हाला समजत नाही. शिष्यांना प्रभूने प्रार्थना शिकवली दावीद राजा स्तोत्र ५:३ मध्ये म्हणतो हे परमेश्वरा प्रातःकाळी तु माझी वाणी ऐकतोस सकाळी मी प्रार्थना व्यवस्थित रचुन तुला सादर करीन आणि तुझी प्रतिक्षा करीत राहीन आणि म्हणुन आम्ही त्या राजांच्या राजाला ही प्रार्थना सादर करत असताना तिचा क्रम व रचना आवश्यक आहे आणि जर आम्हाला ते येत नसेल तर पवित्र आत्म्याकडे ते मागावे तो आत्मा आम्हाला स्वतः शिकवेल की, आम्ही प्रार्थना कशी करावी. रोम ८:२६ आम्ही प्रार्थना करतो पण आम्हाला त्याचे उत्तर मिळत नाही. हयासाठी की, आम्ही योग्य प्रकारे प्रार्थना करत नाही.

परमेश्वराची स्तुती व धन्यवादः

आमच्या प्रार्थनेची सुरूवात ही नेहमी परमेश्वराची स्तुती व धन्यवादानेच व्हावी. कारण तो त्यासाठी योग्य आहे. स्वर्गात सतत केवळ धन्यवाद व स्तुतीच आजही केल्या जाते व पुढेही होत राहणार प्रकटी. १९:१-१० हयात ४ वेळेस हालेलुया हा शब्द वापरला आहे. हालेलुया हया शब्दाचा अर्थ परमेश्वराचे स्तवन करा, आणि म्हणुन देवाने केलेले सर्व उपकार आम्ही आठवावेत आणि त्याचा धन्यवाद करावा. त्याच्या सर्व चांगूलपणा बद्दल त्याची स्तुती करावी.

स्वतःसाठी प्रार्थनाः

रोजच्या दिवसात आमचे समर्पण असावे कळत नकळत अनेक अपराध आम्ही करतो एळाद्या भावाला अरे वेडगळा असे म्हणणे ते सुध्दा पाप आहे. अनेक लोक अनेक वर्षांपासुन अंतःकरणात पाप बाळगूण आहेत. प्रियांनो रोज सकाळी आमच्या प्रार्थनेत कालच पाप आम्ही आठवावे आणि स्वतःचे समर्पण करावे समर्पणाची प्रार्थना स्वर्गाचे दरवाजे उघडते स्वतःला आम्ही शुध्द आणि पवित्र ठेवणे अत्यंत आवश्यक आहे. दावीद स्तोत्र १२०:२ मध्ये म्हणतो हे परमेश्वरा लबाडी करणाऱ्या ओठापासुन व कपटी जिभेपासुन माझा जीव सोडीव.

ख्रिस्तातील प्रभूचा दास
रेव्ह. प्रकाश बी. गद्रे
महाराष्ट्र, स्टेट कॉर्डिनेटर

ही पृथ्वी स्वतःभोवती अविरद भ्रमण करित आहे. जरी साधन सामग्री विपुल आहे. मुद्रण साहित्य, वैज्ञानिक कंप्युटर हे सर्व आपल्याला सांगतात की पुढच्या २० वर्षामध्ये पृथ्वीचे तापमानात बदल होणार आहे. वैज्ञानिक प्रगती, भौतिक शास्त्रातील बदल, अंतराळातील बदल, शेतकी क्रांती, नवीन शोध, बांधकामातील मोठी साधन सामुग्री, आर्थिक आणि दळणवळणातील मोठे बदल, माध्यमांची विपुलता आणि नवीन विचारधारा हे सर्व काही आम्ही म्हणतो की पृथ्वीची भ्रमण क्षमता आहे.

परंतू मनुष्याची बुध्दी काम करण्यास अपात्र ठरली जेव्हा आम्ही २०१९ मधील कोविड सारख्या महामारीकडे आमचे लक्ष वेधतो. येथे परमेश्वर आणि त्याचे नियम वेधतो आम्ही अनुभवतो. आम्हाला हया द्वारे समजण्यास होते की हया पृथ्वीवर त्याचे सामर्थ्य आहे व संपुर्ण जग हे त्याच्या परिभ्रमणामध्ये कार्यशिल आहे.

आमच्या नेत्रांना ही पृथ्वी एका मोठया चेंडू सारखी दिसते. परंतू प्रभूच्या नेत्राला ती एक धुळी सारखी आहे. देवाची योजना आज भूतलावरील प्रत्येक मानव प्राण्यासाठी आहे का त्यांनी हया कष्टातुन जावे व त्याची महान योजना ओळखावी पृथ्वीवर मनुष्य हा कोणत्याही योजनेशिवाय घाईने पैसे कमवण्यासाठी धावत असतो. परंतू ५ दिवसाचा ताप हा सर्व पैसा नष्ट करतो. जेव्हा आपण हे पाहतो तेव्हा आपल्या लक्षात येते की मानवाचा पहिला आशिर्वाद हा अनंत काळचे जीवन आहे.

जर आपण काळजीपूर्वक परमेश्वराने दिलेल्या चेतावणीकडे लक्ष दिले आणि आपल्या पापांची कबूली दिली आणि त्याच्या मार्गावर चालण्याचा निश्चय केला व सर्व पाप सोडले तर ते सर्व आशीर्वाद जे पवित्रशास्त्रात सांगितले आहे ते आपल्या जीवनाला आकार देतील.

परंतू जेव्हा प्रभूचे सेवक व त्याचे आवडते प्रियजण जेव्हा हया भुतलावरून घेतले जातात आम्हाला हे कळत नाही असे का होत आहे आम्ही फक्त अश्रू गाळत असतो. जरी आम्ही दररोज मृत्यु आमच्या समोर पाहतो तेव्हा आमचा लहानसा विश्वास हा डगमगायला लागतो. आणि आम्ही भितीच्या वातावरणात जातो. आम्ही काय करतो जेव्हा आमचे प्रियजन आमचे मित्र हे जग सोडून त्या अनंतकालिन जीवनात विलीन होतात. अनंतकालिन जीवन हे आमच्यासाठी एक मोठे बक्षिस आहे परंतू कोणाला ही आवडत नाही की हे शरीर सोडून त्या अनंतकालिन जीवनाचा अनुभव सदा होत राहावा.

आणि आपला आत्मा त्याच्या हाती दयावा, ज्यांना हया अनंतकालाच्या जीवनाचा आशिर्वाद मिळाला त्यांना वधस्तंभावरील मरणाची भिती नाही. ज्याक्षणी ते आपले डोळे बंद करतात तेव्हा ते आनंदाने देवदुताप्रमाणे उडतात परंतू जे मृत्युक्षयेवर दुःख आणि उसासे टाकत असतात त्यांचे हृदय हे खुप मोठया निराशेने भरलेले असते.

जेव्हा आम्ही दुसऱ्या शहरात प्रवासासाठी जातो तेव्हा सर्वांना भेटुन मग निघतो. आम्ही निघण्या अगोदर आपली इच्छा व जाण्याची योजना हया सर्व गोष्टी त्यांना सांगून निघतो. परंतू काही लोकांनाच ही संधी मिळते की ते हे जग सोडून जाण्याअगोदर आपल्या प्रिय लोकांना व मित्रांना सांगतात की ते स्वर्गाकडे वाटचाल करत आहे.

पवित्र शास्त्रामध्ये एक खुप मोठी घटना दोन सेवक एलिया आणि अलिशा हयांच्या मध्ये दिसुन येते ती म्हणजे एलियाची स्वर्गाकडे वाटचाल. एलिया हा जसा काही एक नवीन देशाचे नागरिकत्व घेण्यासाठी जात आहे आणि म्हणुन तो अलिशाला म्हणतो मी ते घेण्यासाठी जात आहे त्या अगोदर तुला काय पाहिजे? काय प्रगटीकरण आहे. अलिशाने एलियाच्या आत्म्याचा दुप्पट वाटा त्याच्याकडे मागितला ही एक अद्‌भूत इच्छा आहे जो एक शिष्य आपल्या गुरूकडे मागत आहे.

त्याला माहित होते की काय महत्वाचे आहे जे आपण एलिया कडून मागून घ्यावे आणि म्हणुन त्याने मागितले आणि त्याला ते मिळाले. त्याच्यासमोर एलियाला त्या रानामधुन वर उचलण्यात आले हे त्याच्यासाठी हृदय तुटणारे होते. परंतू तरी सुध्दा तो आनंदी होता कारण त्याने एलियाकडून उत्तम ते मागून घेतले होते. आजही, आपण आपल्या प्रियजनांकडून तो महत्वाचा वाटा घ्यावा, जेव्हा न कळत

अनेक आपले प्रियजन दवाखान्यात किंवा घरामध्ये आपल्याला न कळत निघून जातात हया दूःखामध्ये ही आपल्यासाठी तो एक मोठा आनंदाचा क्षण असला पाहिजे.

विश्ववाणी सेवेने ही हया दिवसात अनेक आशिर्वादित सेवक गमावले आहेत कुटूंबाचे प्रमुख सेवेतील उत्तम मिशनरी, प्रमोशन सेवाकार्यातील सेवक ज्यांच्या मध्ये सेवेची नवीन उमेद होती. चला आपण त्यांच्याकडील उत्तम ते काबीज करू जे आमच्यातुन निघुन गेले. चला पुन्हा नव्याने जोमाने दुप्पट सामर्थ्याने प्रभु येशुच्या दुसऱ्या आगमनापर्यंतची वाट पाहत काम करू.

– हरीष प्रेम, विश्ववाणी मिडिया

भक्तीघर आहे

हे जिवंत देवाची भक्ती करण्यासाठी

ज्यांना गौरवशाली सुवार्ता समजली त्यांच्यासाठी हे एक देवाचे दैवी बक्षिस आहे. सुवार्ता प्रसार आणि पुर्ण अंतःकरणाने भक्ती करणे हे त्यांना समजते ज्यांना सत्य समजले आहे. वधस्तंभ हा त्यांच्यासाठी व त्या गावासाठी दिपस्तंभ असा आहे. आणि ते लोकांना सत्याच्या मार्गावर घेऊन येतात सुवार्तेचा परमल ते स्वतःबरोबर घेऊन चालत असतात.

सेवक दिपकरा दलरिया हयाने त्रिपूरा मधील कोविड जिल्हयातील कामी गावात जकमरा लोकांमध्ये सेवेचे काम चालु केले. गावातील लोकांनी सुवार्तेसाठी आपली दरवाजे उघडली. त्यांनी पापांची कबूली केली आणि ख्रिस्ताचा स्विकार केला. सुवार्तेचा अनुभव घेत व विश्वासात वाढत त्यांनी आपल्या लोकांसाठी स्वतंत्र एक कच्चे प्रार्थना घर बांधले.

त्याचे समर्पण आम्ही १६.०५.२०२१ रोजी केले. प्रभू त्यांच्या हाताला अनेक मोठे यश देवो व येणाऱ्या दिवसात कामी लोकांमध्ये सुवार्तेचे मोठे कार्य हया विभागात होवो.

– बंधु. बिश्वजीत जमातीया, अगरताळा

परमेश्वरावर भरवसा ठेवा तुम्ही विजयी होणार आहात.

- रेव्ह. इम्मानुएल गॅनराज- डायरेक्टर- प्रेयर नेटवर्क

परमेश्वराने पाहिले एदेन बागेत मनुष्य एकटा असावा हे बरे नाही म्हणुन त्याने योग्य जोडीदार हव्वा आदामाला दिली. विवाह हा असा नातेसंबंध आहे, पती आणि पत्नी हयांनी एकमेकांना मृत्युने त्यांचा वियोग होईपर्यंत त्यांनी रोगात, दुःखात आणि जीवनाच्या उत्थान, पतनात एकमेकांना साथ द्यावी, जर एक पडला तर दुसरा त्याला सावरून धरील. जर एकाने दुसऱ्याला सावरून धरले तर एकमेकांना साहाय्य करू शकतील. हया संबंधी आपण उपदेशक ८:९-१२ मध्ये वाचतो माणसाचे साहाय्य माणुस करतो.

माणसाला साहाय्याची गरज केव्हा लागते? त्यांना इतरांवर भरवसा ठेवण्याची गरज केव्हा लागते? एक जेव्हा अशी परिस्थिती निर्माण होते, तो विचार करतो तो सर्वकाही करू शकतो आणि त्याला सर्व कामात अपयश येते. दोन, जेव्हा त्याला वाटते एकटे लढण्यापेक्षा दुसऱ्याचे साहाय्य घ्यावे. मित्र सर्व प्रसंगी प्रेम करतो आणि विपत्कालासाठी बंधु म्हणुन तो निर्माण झालेला असतो.- नितीसुत्रे. १७:१७ जरी माणुस माणसावर भरवसा ठेवतो उपदेशक १०:१९ मध्ये सांगितले आहे.

पैशाने सर्व साध्य होते, नितीसुत्रे हयामध्ये हे सुध्दा सांगितले आहे, हे लक्षात ठेव ज्ञान तुझ्यासाठी मधाप्रमाणे आहे, जर ते तुला प्राप्त झाले तर तुझी आशा खुंटणार नाही. जरी मनुष्य ज्ञानाच्या शोधात असला आणि त्यावर भरवसा ठेवून त्याने श्रम घेतले. परंतु पवित्र शास्त्र आम्हाला परमेश्वरावर भरवसा ठेवण्यास प्रवृत्त करते आणि ते योग्य आहे. पवित्र शास्त्रात स्तोत्र ११८:८ मध्ये काय सांगितले आहे? मनुष्यावर भरवसा ठेवण्यापेक्षा परमेश्वराला शरण जावे हे बरे.

आपण पवित्र शास्त्र परमेश्वरावर कसे अवलंबुन रहावे हे शिकण्यासाठी वाचतो का? पवित्र शास्त्रात असे पुष्कळ वचने आहेत जी परमेश्वरावर अवलंबुन राहणे, त्याला अनुसरणे, त्याची सेवा करणे, त्याची वाट

पाहणे, त्याचे साहाय्य यासंबंधी आहेत.

१. मी परमेश्वराचा आश्रय करतो– तु माझा आश्रय आहेः

स्तोत्रकर्त्यांनी लिहिलेली वचने पुष्कळ मार्गांनी सांत्वन करतात. उत्तेजन देतात आणि ईशारा देतात. स्तोत्र २:१२ मध्ये आपण वाचतो. त्याला शरण जाणारे धन्य. हे वचन ईशारा देणारे आहे. परमेश्वर त्याच्या विरूध्द वागणाऱ्यांवर क्रोध करतो. त्याचा क्रोध त्वरित पेटेल. जे त्याला शरण जातात तेच फक्त वाचतील. स्तोत्र ५७ हे एक सुंदर गाणे आपण वाचतो. जेव्हा दाविद शौलापासुन पळुन गुहेत लपला होता तेव्हा त्याने हे लिहीले.

हे परमेश्वरा, मजवर दया कर, मजवर दया कर, ही अरिष्टे टळून जाउपर्यंत मी तुझ्या पंखाच्या छायेचा आश्रय करीन. स्तोत्र ९१ मध्ये दाविद म्हणतो, जो परात्पराच्या गूप्तस्थळी वसतो तो सर्वसमर्थाच्या सावलीत राहील. मी परमेश्वराला म्हणतो तु माझा आश्रय, तु माझा दुर्ग, तु माझा देव तूजवर मी भाव ठेवतो. हया संपूर्ण स्तोत्रात हा संदेश आहे.

जेव्हा आपण त्याच्यावर अवलंबुन राहतो तेव्हा मोठे संरक्षण आणि विश्वास प्राप्त होतो. आपण हया गोष्टीची खात्री बाळगली पाहिजे तो आमचे घातक मरीपासुन आणि पटकी पासुन सांभाळ करील. कारण, तो मजवर प्रेम करतो, परमेश्वर म्हणतो, मी त्याला मुक्त करीन, त्याला माझ्या नावाची जाणीव आहे, तो माझा धावा करील आणि मी त्याचे ऐकेन.

संकटसमयी मी त्याच्याजवळ असेन, मी त्याला मुक्त करीन, मी त्याचे गौरव करीन. आसाफ, त्याच्या स्तोत्रात म्हणतो मजविषयी तर देवासमीप जाणे यातच माझे कल्याण आहे. मी प्रभू परमेश्वराला आपले आश्रयस्थान केले आहे. यासाठी की मी, परमेश्वराची सर्व कृत्ये जाहीर करावी. स्तोत्र ३०:५ खात्रीपुर्वक सांगितले आहे परमेश्वराचा प्रत्येक शब्द न बदलणारा आहे, आणि जे त्याचा आश्रय करतात त्यांची तो ढाल आहे.

२. मी तुझे अनुसरण करीन– तू माझा मार्ग आहेः

नंतर, यहोशवाने ईस्त्राएल लोकांना प्रश्न विचारला यहोशवा २४:१५ मध्ये तो म्हणाला, परमेश्वराची सेवा करणे हे तुम्हास गैर दिसत असले तर तुम्ही कोणाची सेवा करणार हे आज ठरवा. महानदा पलिकडे तुमच्या पुर्वजांनी जे देव पुजिले, किंवा तुम्ही राहत आहा त्या देशातल्या अमोऱ्यांच्या देवांची? मी आणि माझे घराणे तर परमेश्वराची सेवा करणार. परमेश्वराची सेवा करणे म्हणजे त्याला अनुसरणे आणि त्याच्यासाठी कार्य करणे. आपण जग आणि जगातल्या लोकांसाठी काम केले तर काय मिळणार आहे? आपण काय निवडणार आहोत?

३.मी प्रतीक्षा करीन– मी परमेश्वराची प्रतिक्षा करीनः

स्तोत्रकर्ता ३६ स्तोत्रात पुन्हा हे सांगतो, तो परमेश्वराची प्रतिक्षा करत आहे. आणि परमेश्वराची प्रतिक्षा करण्याचे महत्व त्याला कळले आहे. मनुष्य अनेक गोष्टींच्या मागे धावत आहे. तो उठतो आणि बसची प्रतिक्षा करतो त्याच्या नोकरीच्या ठिकाणी जाण्यासाठी त्याला दुकानात आणि रेल्वे स्टेशनमध्ये रांगेत उभे राहावे लागते. जरी त्याचा चित्तस्थैर्य बिघडले, तरी त्याला प्रतिक्षा करावीच लागते– अनेक ठिकाणी आपण आरक्षण करतो आणि प्रतिक्षा करतो. आपण पैसे बँकेत जमा करतो आणि ते तिप्पट होण्याची प्रतिक्षा करतो. आपल्या मुलांसाठी योग्य जोडीदार मिळेपर्यंत आपण प्रतिक्षा करतो.

परंतु जीवनात परमेश्वराची प्रतिक्षा करणे महत्वाचे आहे. स्तोत्र– ५:३ मध्ये दाविद म्हणतो, हे परमेश्वरा

प्रातःकाळी तु माझी वाणी ऐकतोस, सकाळी मी प्रार्थना जुळवुन ती तुला सादर करीन, आणि तुझी प्रतिक्षा करीत राहीन, स्तोत्र २५ मध्ये तो पुढे म्हणतो– तु माझा तारणारा देव आहे, आणि माझी आशा तुझ्या ठायी आहे. आणि स्तोत्र ३३:२० मध्ये तो पुढे म्हणतो, आमचा आत्मा परमेश्वराची प्रतिक्षा करत आहे, आमचे साहाय्य व ढाल तोच आहे.

स्तोत्रकर्ता अशी अनेक कारणे सांगतो आणि त्याची इच्छा आणि परमेश्वरा बरोबरचे वैयक्तिक नाते त्याप्रमाणे आहे, पहाटेची वाट पाहणाऱ्या पहारेकऱ्यापेक्षा, माझा जीव प्रभु परमेश्वराची अधिक वाट पाहतो. जे परमेश्वरावर भाव ठेवतात ते त्याची वाट पाहतात.

४. मी त्याच्यावर भाव ठेवतो– तु माझे सामर्थ्य आहेस:

दाविद राजानंतर जे तीन राजे झाले त्यांच्या जिवा संबंधी आपण मनन करू. १. अबिया राजा– तो नेहम्याचा पुत्र होता. इतिहासात सांगितले आहे, त्याने यहुदावर ख्रिस्तपुर्व ९१३– ९११ पर्यंत राज्य केले. २ इतिहास १३ मध्ये युध्दाचे विवेचन केले. जेव्हा यराबामाने १० वंश घेण्यासाठी यहुदावर समोरून आणि जवळुन हल्ला झाला. वचन १४ आणि १५ सांगते, परमेश्वर यहुदा आणि अबिया बरोबर होता आणि त्यांना त्याने यराबाम आणि इस्त्राएलापासुन सोडवले, वचन १८ मध्ये सांगितले आहे इस्त्राएलाचा पराभव झाला आणि यहुदाचा विजय झाला.

कारण त्यांचा भरवसा परमेश्वरावर त्यांच्या पुर्वजांच्या देवावर होता.

२. आसा राजा– नंतर अबियाचा पुत्र आसा राजा झाला. त्याने ख्रिस्तपुर्व ८१० ते ८७० पर्यंत राज्य केले. जेरह नावाचा एक कुशी पुरूष १० लक्ष पुरूषांची सेना आणि ३०० रथ घेवुन त्याच्यावर चाल करून आला. आसाने परमेश्वराकडे साहाय्यासाठी प्रार्थना केली. या प्रसंगी आसाने आपला देव परमेश्वर याची प्रार्थना केली. हे परमेश्वरा, सबलांच्या विरूध्द निर्बलांचे साहाय्य करणारा तुजवाचून अन्य कोणी नाही, हे आमच्या देवा, परमेश्वरा आमचे साहाय्य कर, आमची भिस्त तुजवर आहे, आम्ही तुझ्यावर भरवसा ठेवून या समुहाशी सामना करण्यास आलो आहो.

हे परमेश्वरा तु आमचा देव आहेस मर्त्य मानवांचे तुजवर वर्चस्व होवू देवू नको.– २ इतिहास १४:११ ही पवित्र शास्त्रातील उत्कृष्ट प्रार्थना आहे.

परमेश्वर त्याजवर भरवसा ठेवणाऱ्यांचे साहाय्य करतो. पुढच्या वचनात सांगितले कुशी लोक पळुन गेले. आमचा असा परमेश्वर आहे जेव्हा आम्ही त्याला साहाय्य मागतो तो आमचे साहाय्य करतो. आम्ही त्याच्यावर भरवसा ठेवतो का?

३. यहोशाफाट राजा– त्यानंतर आसाचा पुत्र, यहोशाफाट राजा इतिहास सांगतो त्याने ख्रिस्तपुर्व ८७० ते ८४९ पर्यंत राज्य केले. त्याच्या कारकिर्दीत देश परमेश्वराचे भय धरत होता, मवाबी आणि अम्मोनी त्याच्या विरूध्द चालुन आले. आपण या युध्दासंबंधी २ इतिहास २० अध्यायात वाचतो. ३ वचनाची सुरूवात यहोशाफास धाक पडला. ही आहे भितीचा परिणाम काय झाला? त्याने उपास धरून परमेश्वराचा धावा केला. त्याच्या प्रार्थनेने त्याला शिकवले भितीचे समयी पुर्ण विजयी कसे व्हावे.

वचन १२ मध्ये तो म्हणतो, आम्ही काय करावे ते आम्हास सुचत नाही, पण आमचे डोळे तुजकडे लागले आहेत. हया प्रार्थनेचे उत्तर वचन २४ मध्ये आहे. कोणी निभावला नाही हा निकाल होता यहोशाफाटाचा कारण त्याचा भरवसा पुर्णपणे परमेश्वरावर होता. आणि त्याला पुर्ण विजय मिळाला.

म्हणुन सर्व परिस्थितीत, सर्व गरजांसाठी परमेश्वरावर अवलंबून राहु आणि विजय मिळवु.

आम्ही त्या सर्वांचे आभार मानतो ज्यांनी सेवाक्षेत्रातील गरिबांसाठी धान्य वाटप करण्यासाठी आपला वाटा उचलला...

देवाच्या लेकरांच्या मदतीद्वारे ज्या घरामध्ये अन्न आले. प्रभु त्या सर्वांना आशिर्वादित करो. सेवाक्षेत्रातील विश्वासणारे नेहमी त्यांना प्रार्थनेत उंच करतील. त्यांची इच्छा येशुची प्रिती नेहमी हया हजारो लोकांमध्ये नेहमी राहावी. राज्यातील सर्व समन्वयकांकडून जेव्हा त्यांचा अहवाल आमच्या पर्यंत पोहचला.

तेव्हा १० राज्यातील अत्यंत महत्वाची गरज म्हणजे त्यांना अन्नधान्य पुरवठा करणे हे आम्हाला समजले आणि म्हणुन १४ एप्रिल रोजी हे धान्य वाटप करण्यात आले. आम्ही हया कठीण परिस्थितीमध्ये ही पुर्ण क्षमतेने सेवाकार्य सुरू ठेवले जे हया महामारी संबंधी निर्धास्त होते त्याच्या पर्यंत जावून महामारीची जाग्रती आम्ही केली.

त्यांना वैदयकीय उपचार मिळवून देणे, उत्कृष्ट भोजन वाटप तसेच मासे वाटप करून मोठी मोहीम पार पाडण्यात प्रभूने आमचे साहाय्य केले. जो पर्यंत परिस्थिती पुर्वस्थितित होत नाही तोपर्यंत आम्ही हे काम हाती घेवून पुढे चालु.

प्रभू जर आपणास मार्गदर्शन करत असेल तर आपण आम्हाला प्रार्थनेत उचलुन धरा व साहाय्याचा हात दया. प्रभू त्याची इच्छा आणि योजना पुर्णपणे हया सेवाक्षेत्रामध्ये कार्यरत करो.

तेव्हा राजा त्यांस उत्तर देईल, मी तुम्हास खचित सांगतो की, ज्याअर्थी तुम्ही हया माझ्या कनिष्ठ बंधुपैकी एकाला केले, त्याअर्थी ते मला केले आहे. मत्तय २५:४०

01 Jammu Kashmir

02 Himachal Pradesh

03 Punjab

04 Uttarakhand

05 Delhi

06 Jharkhand

07 Chhattisgarh

08 Gujarat

09 Telangana

10 Andhra Pradesh

क्षेत्रीय वार्ता

पाहा, देव माझे तारण आहे, मी भाव धरितो, भीत नाही, कारण प्रभू परमेश्वर माझे बल व गीत आहे, तो मला तारण झाला आहे. – यशया १२:२

स्तुती आणि प्रार्थना

०१ जम्मू काश्मिर

काटलटी गावातील मनोरमी हीची सैतानाच्या तावडीतुन सुटका झाली आणि ती आणि तिचे कुटूंब येशूच्या मागे चालतात. ५ लोकांनी त्यांच्या विश्वासाची कबूली दिली. बुदवानी सेवाक्षेत्रातील चेदीलाल चे कुटूंब शांतीचे पात्र झाले आहे. धालोट, रायपुर आणि परीया गावामध्ये सेवेकरिता नवीन संपर्क मिळाले आहेत. प्रभूची स्तूती असो. धानोडी सेवाक्षेत्रातील प्रार्थना मंदीराचे बांधकाम पुर्ण व्हावे. रेसी, रमबान, आणि उधामपूर जिल्हयातील लोकांनी विश्वास कबूली साठी तयार व्हावेत. सेवक राकेश आणि त्याच्या पत्नी रेनु यांना प्रभूने आजारातून उठवावे. प्रभूने नवीन दरवाजे उघडावे ज्यांनी आपल्या नोकऱ्या गमावल्या आहेत त्यांच्यसाठी प्रार्थना करा.

०२ हिमाचल प्रदेश

जंगल गावामध्ये विश्वासणारे आणि त्यांच्या कूटूंबियांनी प्रार्थना मंदीर बांधण्याचे ठरविले आहे. प्रभू येशूच्या नावामध्ये ५ कूटूंबांना तारण प्राप्त झाले आहे. ६ लोकांनी विश्वासाची कबूली दिली. ४ सभा आयोजित करण्यात आले होते राष्ट्रांसाठी प्रार्थना करण्यात आले. सेवक मदनलाल ची पत्नी राजानी आणि २ मुले प्रभूकडे गेले आहेत त्यांचे सांत्वन व्हावे. सेवक जोगिंदर याला प्रभूने आजारातून उठवावे. धालाखेन, भादवर, नाजो चाक आणि सूर्या नागरोटा येथील विश्वासणाऱ्यांची वाढ व्हावी.

०३ पंजाब

३७ लोकांनी प्रभू येशुमध्ये विश्वासाची कबूली दिली. सामाजिक अंतर ठेवून घेण्यात आलेली सत्यशोधक

सभेमध्ये ४३ लोकांचे तारण झाले. २५ कूटूंबांनी देवाच्या वचनाची रूची दाखविली आणि विश्वासी संगतीमध्ये सामील झाले. देवाच्या कृपेने अदामपूर येथील प्रार्थना मंदीराच्या बांधकामाची नोंदणी झाली आहे. परमेश्वराची स्तूती असो. सेवक राहुल कूमार ची पत्नी पोटाच्या आजाराने ६ महिन्यापासून त्रस्त आहे. बालामगड आणि तालवंडी सेवाक्षेत्रातील प्रार्थना मंदीराचे बांधकाम पूर्ण व्हावे. २८ वर्षांची लव्हली जी ५ वर्षांपासुन मद्यपान करत आहे ती मुक्त व्हावे. पवन आणि सोनिया जे बाळ व्हावे म्हणुन प्रार्थना करत आहेत. प्रभूने त्यांची प्रार्थना ऐकावी.

०४ उत्तराखंड

प्रसार माध्यमांच्या द्वारे ६ कूटूंबांनी येशू ख्रिस्ताचा स्विकार केला आहे. रूमाली चे पुर्ण कूटूंब आवडीने देवाचे वचन ऐकत आहे. जसवंत सिंग आणि परवीन देवी हॉस्पिटल मधुन परत आले आहेत आणि ते देवाचे गौरव करत आहेत. विश्वासी शंकर यांचे लग्न मोतीचूर या ठिकाणी अद्भूत रित्या पार पडले. लाभोली प्रांतातिल २० लोक विश्वास कबूलीसाठी तयार आहेत. कोरोना वार्ड मध्ये काम करणारी बहीण पिंकी पानवान यांचे प्रभूने संरक्षण करावे. सागर यांची नोकरी गेली आहे त्यांना परत नोकरी मिळावी. महामारीमध्ये सेवक ऋषिकेश राणा ची पत्नी आणि ३ मूले प्रभूकडे गेले आहेत त्यांच्यासाठी प्रार्थना करा.

०५ दिल्ली

९१ कूटूंबांना रोजच्या गरजा पूरवठा करण्यात आल्या. विश्वासणाऱ्यांच्या सभेमध्ये १ तास देशासाठी प्रार्थना करण्यात आली. विष्णु आणि राजेश चौहान यांना नोकरी मिळाल्यामूळे ते देवाचे गौरव करत आहेत. खादेर आणि प्रियांका कॅम्प येथील नवीन लोकांची भेट घेण्यात आली आणि त्यांच्या गरजा पुरविण्यात आल्या. प्रभूची स्तूती असो. कांचनगूंज येथील जे विश्वासणारे विश्वासातुन मागे गेले आहेत त्यांना प्रभून परत आणावे. अब्देश, मोनीया आणि मॅरी यांची गरिब परिस्थिती बदलावी. १५ टेलरिंग च्या मशीन विश्वासणाऱ्यांना देण्यात याव्या. उच्च शिक्षण घेवू इच्छिणाऱ्या तरूणांना प्रभूने आशिर्वादित करावे.

०६ हरयाणा

प्रभू येशूमध्ये ७ लोकांनी विश्वासाची कबूली दिली. लॉकडावून मध्ये जजनपूर येथील २ कूटूंबांना अन्न पूरवठा करण्यास प्रभूने आम्हाला साहाय्य केले. ३ वर्षाचा रोहित याला श्वाच्छोश्वास घेण्यास त्रास होत होता, प्रभूने त्याला आरोग्य दिले. देवाचे वचन वास्तविक सभेमध्ये सांगण्यात आले ६ लोकांनी प्रभू येशूमध्ये नवीन सूरू केले आहे. जजनपूर, बाबियाल आणि साहा येथे देवाचे वचन पेरण्यात आले तेथील लोकांच्या हृदयात कार्य करावे. ज्या लोकांच्या नोकऱ्या गेल्या आहेत प्रभूने त्यांना साहाय्य करावे.

एप्रिल–२०२१ मध्ये १९७ तरूण सेवकांना सेवाक्षेत्रामध्ये पाठवण्यात आले. कृपया हया तरूणांसाठी प्रार्थना करा. प्रभूच्या अग्निने हे लोक भरल्या जावो. व अनेक लोक त्यांच्या द्वारे विश्वासात उभे राहो.

०७ राजस्थान

मेवाडी आणि वागडी लोकांमध्ये बायबल अध्ययन ची सभा घेण्यात आली. सूवेरी सेवाक्षेत्रातील ५ कूटूंबांना नवीन जीवन प्राप्त झाले. नंजतवाड जो १ महिन्यापासून आजारी होता प्रभूने त्याला आरोग्य दिले. पालियाखेडा, नेनबारा आणि मकदादेव गावामध्ये प्रभूने नवीन संपर्क दिले प्रभूची स्तूती असो. नवीन विश्वासी नारायण लाल आणि दुर्गा यांच्या साक्षीद्वारे पुष्कळ लोक प्रभूकडे यावे. कोट्रा क्षेत्रातील सेवेतील अडखळण प्रभूने दूर करावे. सारादित क्षेत्रातील प्रार्थना मंदीराचे बांधकाम पूर्ण व्हावे. ६६ मेवाडी लोकगट विश्वास कबूलीसाठी तयार व्हावे यासाठी प्रार्थना करा.

०८ उत्तर प्रदेश – भोजपूरी प्रांत

सर्वेक्षणात ३६ गावांना सेवेसाठी ओळखण्यात आले. विश्वासी केवत राम, सोहन राम आणि कृष्णावती देवी हे दवाखान्यातून स्तूती करत परत आले. प्रसार माध्यमाच्या द्वारे ४५ कूटूंबांनी प्रभूचा स्विकार केला. सुरेरी प्रशिक्षण केंद्रामधुन २५ सेवकांना त्यांचे ३ महिन्यांचे प्रशिक्षण पुर्ण करून सेवेसाठी पाठविण्यात आले. प्रभूने शंकूतला देवी हीला आरोग्य दयावे. कादीपूर आणि तूळापूर येथील लोकांनी देवाचे वचन ऐकले आहे प्रभूने त्यांच्या हृदयात कार्य करावे. माया देवी चे कूटूंब बाळ होण्यासाठी प्रार्थना करत आहेत प्रभूने त्यांची प्रार्थना ऐकावी.

०९ बिहार

चाकीया गावातील बच्चलाल प्रभू येशूच्या नावात चालायला सुरूवात केला. प्रसार माध्यमाच्या द्वारे केलेली सेवा ४८० लोकांना उपयोगी ठरली आहे. आणि त्यामुळे २० कूटूंबानी विश्वास कबूली साठी तयार झाले आहेत. बबन राम आणि यूवराज कूमार हे त्यांच्यासोबत घडलेला चमत्कार लोकांना सांगत आहेत. पिरो आणि मदूरा येथे सेवेसाठी प्रभूने दरवाजे उघडले आहेत. परमेश्वराची स्तूती असो. मुलांच्या सभा घेण्यासाठी प्रयत्न घेण्यात यावे. गावकऱ्यांचे काम गेल्यामूळे ते त्रस्त आहेत प्रभूने त्यांना नवीन जीवन दयावे. १४ नवीन सेवकांनी प्रशिक्षण पूर्ण केले प्रभूने त्यांचा सेवेसाठी उपयोग करून घ्यावा. यासाठी प्रार्थना करा.

१०. झारखंड

१४४ कूटूंबाचे दैनंदिन गरजा भागवल्या गेल्या. बायबल अध्ययन गट नवीन तीन गावात सुरू केले आहे. सेवकांने गावातील लोकामध्ये मास्क व सेनिटायजर वाटप करण्यात आले आणि त्यांना माहिती देण्यात आले. नवताली प्रशिक्षण केंद्रामध्ये ५० नवीन सेवकांनी बायबल चे प्रशिक्षण पुर्ण केले आहेत. मितास आणि मनिता या दोघींना प्रभुने फिट च्या आजारापासुन आरोग्य दिले. सेवेला विरोध करणारे गांगु वोरान, भांगा वोरान आणि अर्जुन सिंग यांची परमेश्वराने भेट घ्यावी. परमेश्वराने लांगु, बुधू मोची यांना दुष्ट आत्म्याच्या तावडीतुन सोडवावे. ३० गावामध्ये आराधना गट सुरू होण्यासाठी प्रार्थना करा.

११. पश्चिम बंगाल– कूच बिहार जिल्हा

नयालीन गावात सुवार्ता पसरत आहे. सालधुरा सेवाक्षेत्रातील अजित ओराव यांच्या पुर्ण कूटूंबाने प्रभूची सेवा करण्याचे निर्णय घेतले आहे. सानया लाईन गावातील कार्तिक माझी यांनी प्रार्थनेसाठी आपले घर खुले केले. नवीन विश्वासणारा बंधु. आर. एम याने सुवार्ता कार्यासाठी रूची दाखवली आहे प्रभूची स्तूती असो. उत्तर रामपुर गावकऱ्यांचे तारण व्हावे. सेवक बिपुल रॉय ची आई आजारी आहे ती येशुच्या नावात चालावी. बहीण तुलसीबारा आणि जिवंती कुलूक यांनी देवाचे वचन ऐकले आहे त्यांचे तारण व्हावे. जंगली लाईन आणि मुंशी लाईन सेवाक्षेत्रातील लोकांचे जीवनशैली बदलावे यासाठी प्रार्थना करा.

१२. पश्चिम बंगाल– दार्जिलिंग जिल्हा

बंधु. ताचिया यांचे अंतःकरण प्रभू येशूमध्ये नवीन झाले आहे. साप्ताहिक सभा सुरू करण्यात आले

आहेत. बंधु. संजय ओरान यांचे प्रार्थनेद्वारे दुष्ट आत्मा निघून गेला. नवीन लोक गायगंगा भक्ती गटाला येत आहेत. ताईपो सेवाक्षेत्रामध्ये सामाजिक अंतर ठेवून जागरूकता सुरूवात आहे. प्रभूची स्तूती असो. नवीन विश्वासी मनिषा आणि तिच्या सर्व कुटूंबियांचे तारण व्हावे. महामारीच्या काळात आपले नोकऱ्या गमावलेल्या त्यांच्यासाठी देवाने मार्ग मोकळे करावे. प्रभू येशूच्या नावात जयमांती ओरान आणि अजित प्रधान यांची सर्व बीमारी पुर्णपणे निघुन जावे. आसपासच्या गावातील गरजुंसाठी दैनंदिन गरजा पुरविण्यात याव्या यासाठी प्रार्थना करा.

१३. पश्चिम बंगाल– एथेलबारी प्रांत

०३ नवीन सेवकांची बायबल प्रशिक्षण पुर्ण करून एथेलबारी सेवाक्षेत्रात नियुक्ती झाली.परमेश्वराने ५ नवीन आत्मे केलाबारी सेवाक्षेत्रात दिले. ५ सेवाक्षेत्र अलिपुरदूर जिल्हयात उघडण्यात आले. परमेश्वराने रूतीया व कूटूंबियांना शांतीचे पात्र म्हणुन निवडले. परमेश्वराची स्तूती असो.

नवीन सेवकांसाठी गावामध्ये जाण्यासाठी ३ सायकलची गरज आहे. कायजोट आणि मध्य चेकमारी सेवाक्षेत्रात प्रार्थना मंदीराचे बांधकाम सुरू व्हावे. बेगुनबारी येथील लोकांनी देवाचे वचन ऐकले त्यांचे परिवर्तन व्हावे. मोनोमिता मोचारी यांना प्रभूने बाळ देवून आशिर्वादित करावे यासाठी प्रार्थना करा.

१४. सिक्कीम

सेवाक्षेत्र हातीडूंगा आणि सिसनी येथील लोकांची आत्मिक वाढ होत आहे. केयजाली प्रांतात मिडीयाद्वारे केलेली सेवा उपयोगी ठरली. दरप गावातील लोक जे आजारी होते ते आता पूर्णपणे बरे झाले आहेत आणि ते देवाचे गौरव करत आहेत. सेवक निमचो लेपचा आणि करमा लेपचा यांनी देवाच्या सुवार्तेचा प्रचार करीत आहेत आणि ते देवाची स्तूती करत आहेत. परमेश्वराची स्तूती असो.

समडोंग क्षेत्रातील गावकरी महामारीमूळे घाबरले आहेत देवाने त्यांना सामर्थ्य दयावे. नालाकथांग चे गावकरी पश्चाताप करावे आणि सुवार्तेवर विश्वास ठेवावे. नवीन विश्वासणारा बिकाश गूरूंग आणि त्यांचे कूटूंब विरोधकांना सामोरे जात आहेत प्रभू त्यांचे संरक्षण करो. राधिका राय आणि तारा चेत्री फिट च्या आजाराने त्रस्त आहेत प्रभू त्यांना स्पर्श करावा यासाठी प्रार्थना करा.

१५. आसाम

आतिबारी सेवाक्षेत्रात प्रार्थना मंदीर बांधण्यात आले प्रभूची स्तूती असो. सेवक पंजिका ब्रम्हा यांच्याद्वारे प्रभूने आजारी लोकांना नवीन जीवन दिले आहे. परमेश्वराची स्तूती असो. बेरगाव जो मानसिक आजाराने त्रस्त होता त्याने सुवार्ता ऐकली आहे आणि त्याच्यासाठी ते फायदेशीर ठरले आहे. तिला सरकारी नोकरी मिळाली आहे. बसंती राभा चे कुटूंब बायबल वाचायला सुरूवात केली आहे. दिपांकर राभा याचे संपूर्ण कुटूंब प्रभूच्या सेवेसाठी पुढे आले आहेत. गरजु लोकांना दैनंदिन गरजा पुरविण्यात याव्या. बोलामगूरी

एप्रिल– २०२१ मध्ये ३२ प्रार्थना मंदीरे सेवाक्षेत्रामध्ये समर्पित करण्यात आले. १५७ ठिकाणी प्रार्थना मंदीर लवकरात लवकर बांधुन पूर्ण व्हावे म्हणुन प्रार्थना करा.

आणि बारोगुरी येथील १५ लोक विश्वासाची कबूली देण्यासाठी तयार आहेत. देवोहाती गावामध्ये सत्यशोधक सभा सुरू आहे अधिक आत्मे मिळावेत. गीता ब्रम्हा यांचे कूटूंब विरोधकांना सामोरे जात आहेत प्रभू त्यांचे संरक्षण करो यासाठी प्रार्थना करा.

१६. मणीपूर

सेवकांच्या द्वारे ऑनलाईन सभा आयोजित करण्यात आली आणि ९२ लोकांना येशूची सुवार्ता कळाली आहे. उटलाव गावातील विश्वासी रोमा सिंगचा सेवेसाठी मदत मिळत आहे. सोलन कोंजिन येथील लोक जे सुवार्तेसाठी रूची दाखवत आहेत त्यांची वाढ व्हावी. खोइजूम साबल क्षेत्रातील पुष्कळ लोकांनी चमत्कार आणि अद्भूत कृत्ये अनुभवली आहेत परमेश्वराची स्तूती असो.

लंगथाबल गावकऱ्यांना देवाचे वचन सांगण्यात आले त्यांची वाढ व्हावी. महामारीच्या काळात अनेक लोकांनी आपल्या प्रियजनांना गमावले आहेत त्यांचे सांत्वन व्हावे. आसपासच्या गावातील लोकांना दैनंदिन गरजा मिळाव्यात. खुनौ मैपी आणि जिरीबम येथील लोकांच्या दैनंदिन गरजा पुर्ण व्हाव्यात.

१७. ओडिसा– हो, संताली प्रांत

हो, संताली लोकांमध्ये ३५ नवीन सेवाक्षेत्र उघडण्यात आले. बारीपाडा सेवाक्षेत्रामध्ये ५ लोकांनी त्यांच्या विश्वासाची कबूली दिली आहे. महामारीच्या काळामध्ये प्रभूने सेवक पुरूषोत्तम मूरमू आणि त्याच्या पत्नीला आरोग्य दिले आहे. कंकादासोले सेवाक्षेत्रामध्ये प्रार्थना मंदीराचे बांधकाम पूर्ण झाले आहे. परमेश्वराची स्तूती असो. महामारीच्या काळात मयुरभंज जिल्हयातील आरोग्य कर्मचारी आणि मेडीकल कर्मचारी यांना संरक्षण मिळावे. सेवक निमाई हेमब्राम याला प्रभूने आरोग्य दयावे. संताली येथील ३ नवीन कूटूंबे विश्वासाची कबूली देण्यासाठी तयार आहेत. २० % विश्वासणारे आराधना गटामध्ये रूपांतरीत व्हावे यासाठी प्रार्थना करा.

१८. ओडिसा– हो, कंधमाल जिल्हा

शुद्रा आणि नंदीनी सेवाक्षेत्रातील ५ लोकांनी विश्वासाची कबूली दिली. रंजीता दिगल हीला देवाकडून आरोग्य मिळाले आणि ती इतरांना सांगत आहे. ३ लोकांनी सालागूडा विश्वासी संगती मध्ये सहभागी

एप्रिल आणि मे या महिन्यामध्ये ७५० लोकांनी पाण्याद्वारे आपल्या विश्वासाची कबुली दिली. कृपया हया लोकांसाठी प्रार्थना करा.

झाले. देवाचे वचन कूई लोकांमध्ये पसरत आहे आणि सिलु नायक येथे गट तयार झाला आहे. मोनेहीम नायक च्या कुटूंबांनी त्यांच्या जन्मलेल्या बाळाला गमावले आहे प्रभू त्यांचे सांत्वन करो. मडांगी आणि बातागूडा येथील प्रार्थना मंदीराचे बांधकाम पुर्ण व्हावे. सेवक लाजर ची मुलगी एस्तर जी रक्ताची उलटी करत होती ती आता उपचार घेत आहे. पनसापाडी प्रांतातील डॉक्टर आणि आरोग्य कर्मचारी यांना प्रभूने संरक्षण दयावे यासाठी प्रार्थना करा.

१९.ओडिसा– रायागड्डा जिल्हा

सेवक बिराज रायतो मलेरिया आजारापासुन बरा झाला आहे आणि सेवेला सुरूवात केली आहे. प्रसारमाध्यमाद्वारे २५० लोक जमा झाली आहेत, आणि ते सुवार्ता ऐकण्यासाठी इच्छुक आहेत. बुध्दा साहारा यांचे कुटूंब देपागूडा विश्वासी संगती मध्ये सहभागी झाले. आराधना व प्रार्थना सभा घेण्यास देवाने साहाय्य केले. परमेश्वराची स्तूती असो.

पेरपंगा सेवाक्षेत्रामध्ये नवीन विश्वासणारे आत्मिकरित्या वाढत आहेत. पेडागूडा गावातील विश्वासणारे जे विरोधाला सामोरे जात आहेत देवाने ते दुर करावे. सारगीडांगो येथील लोकांनी देवाचे वचन ऐकले आहे त्यांचे परिवर्तन व्हावे. अरासिनगूडा येथील लोकांनी पहिल्यांदा देवाचे वचन ऐकले आहे त्यांनी स्वतःला समर्पित करावे यासाठी प्रार्थना करा.

२०.ओडिसा– संबलपुरी प्रांत

सेवक मुकूंद सहार याच्याद्वारे ५ नवीन गावामध्ये आम्ही पोहचलो. प्रियाब्रटा बरिक स्वःइच्छेने सेवक बिकास भैना यांना मदत करतात. परमेश्वराने बहीण रिमा नाग हीला आरोग्य दिले. ती आपली साक्ष सिलाजोर गावामध्ये देत आहे. संजय उर्मा आणि राजेंद्र प्रधान हे प्रभू येशू ची सुवार्ता सांगण्यासाठी इच्छुक आहेत. कारलामुहान गावातील महामारीचे दृश्य येशूच्या नावात दूर व्हावे. बिनोदिनी जी अशक्तपणामुळे अंथरूणाला खिळली आहे प्रभूने तिला उठवावे. रेंगाली विश्वासणाऱ्यांच्या द्वारे शेजारील गावे प्रकाशात यावी. यासाठी प्रार्थना करा.

२१.छत्तीसगढ– चांभा प्रांत

७ लोकांनी त्यांच्या विश्वासाची कबूली दिली. तरोड गावामध्ये जो विरोध आहे तो कमी व्हावा. सुवार्ता कार्यासाठी दरवाजे उघडण्यात यावे. जामजूनवानी प्रांतातील भुदानी चे कुटूंब शांतीचे पात्र बनले आहे. नवीन लोक धोंतराई आणि तिलाई विश्वासी सभेला येत आहेत. परमेश्वराची स्तुती असो.

सतनामी आणि ओरान लोकगटामध्ये नवीन २१ सेवकांना पाठविण्याची योजना व्हावी. बिलासपुर आणि रायगड जिल्हयामध्ये सेवाक्षेत्र उघडण्यासाठी घेण्यात आलेल्या प्रयत्नांना यश मिळावे. चावरामा गावामध्ये देवाचे मंदीर उघडले जावे. माहुवापारा येथील विश्वासणारे जे विरोधाला सामोरे जात आहेत प्रभू त्यांचे संरक्षण करो. यासाठी प्रार्थना करा.

२२.छत्तीसगढ– रायपुर प्रांत

५ लोकांनी त्यांच्या विश्वासाची कबूली दिली. लॉकडाउनच्या काळात देवाचे वचन सांगण्याची प्रभूने

आम्हाला संधी दिली. दिनेश यादव सुवार्ता ऐकून दारू पिणे थांबवले आहे. बसंती विश्वकर्मा ही सैतानाच्या बंधनातुन मुक्त झाली. परमेश्वराची स्तुती असो.

कोमल साहु च्या कूटूंबाने ३० वर्षांचा त्यांचा तरूण मुलगा गमावला आहे प्रभू त्यांचे सांत्वन करो. विजय च्या कूटूंबाने धैर्य ठेवावे कारण तो दारूच्या व्यसनात अडकला आहे. सारसिवा आणि गिरवानी सेवाक्षेत्रातील विश्वासणाऱ्यांनी सुवार्ता कार्यामध्ये सहभागी व्हावे. लॉकडाउनमुळे आसपासच्या गावातील लोकांचे उत्पन्न कमी झाले आहे त्यांना रोजगार मिळावा आणि दैनंदिन गरजा पुर्ण व्हाव्यात यासाठी प्रार्थना करा.

२३. मध्यप्रदेश

भुली चे पुर्ण कुटूंबाला शांती प्राप्त झाली आहे कारण त्यांनी व्यसन करायचे सोडले आहे. बंधु. सुनील चे कुटूंब जे समस्येमध्ये होते त्यांनी सुवार्तेवर विश्वास केला आणि त्यांच्या समस्या सुटत आहेत. आणि त्यांना एकत्र राहताना देवाची शांती मिळाली आहे. नवीन विश्वासी गुडिया हिला स्वतःचे घर घेण्यास प्रभुने साहाय्य केले. प्रार्थनेद्वारे गणेश आणि शंकर यांचे आजारी अंथरूण बदलले आहे. सिता हीला कूष्ठरोग आहे प्रभूने तिला स्पर्श करावा. जितेंद्र यांचे पावसामूळे घराचे छप्पर पडले आहे ते पुन्हा बांधण्यात यावे. गावकऱ्यांना दैनंदिन गरजा आणि नोकऱ्या मिळाव्यात. ६ वर्षापासुन काला बाई यांचे कूटूंब बाळाची वाट पाहत आहेत प्रभुन ते दयावे यासाठी प्रार्थना करा.

२४. गुजरात– नर्मदा जिल्हा

नर्मदा जिल्हयात आराधना गटाची ३० पर्यंत वाढ व्हावी. ६ नवीन सेवकांनी जे सेवा सुरूवात केली आहे प्रभुने त्यांचा उपयोग करून घ्यावे. इंदलवी येथे शिवणकामाची सुरूवात झाली आहे तेथे १० लोकांनी सहभाग घेतला आहे. मेळा आणि कार्यक्रमासाठी प्रभूने आम्हाला स्पीकर आणि साउंड सिस्टीम दिले आहे . प्रभूची स्तूती असो. वेडगाम येथील विश्वासणाऱ्यांची वाढ होत आहे. रेलवा आणि मोटा काकडीमा येथील आराधना गटासाठी प्रार्थना मंदीर बांधण्यासाठी जागा विकत घेण्यात यावी. नर्मदा जिल्हयामध्ये अजुन १० सेवकांना पाठविण्याची आमची इच्छा आहे. उमरपाडा येथील विश्वासणाऱ्यांकडून शेजारील गावामध्ये सुवार्ता प्रसार करण्यात यावी. यासाठी प्रार्थना करा.

१०९८५ लोक विश्वासाची कबूली देण्यासाठी तयार आहेत. कृपया स्थानिक सेवकांसाठी प्रार्थना करा हया सर्व विश्वासणाऱ्यांना योग्य ते बाप्तिस्माचे प्राथमिक शिक्षण मिळावे. आणि ठरलेला वेळेत हयांनी बाप्तीस्मा घ्यावा.

२५. महाराष्ट्र

७ नवीन कुटूंबांना प्रभूने पचाळा विश्वासी संगती मध्ये सामील केले आहे. बंधु. राजकूमार मडावी यांची आत्महत्या करण्याची प्रवृत्ती सुवार्तेमुळे विचार बदलले आहे. तिच्या साक्ष सांगण्यामुळे तिला नवीन जीवन मिळाले आहे. शिवदास भिल याच्या किडनीला सुज होती प्रभूच्या स्पर्शाने कमी झाली आहे. सातलवाडा येथील ज्या लोकांनी देवाचे वचन ऐकले आहे त्यांच्यासाठी मार्ग मोकळे झाले आहेत. परमेश्वराची स्तूती असो. जगदीश आणि रूपेश यांनी मद्यपान करण्याचे सोडले आहे. सौंदड च्या सेवकाला राहण्यासाठी घर मिळावे. सक्करगा आणि कोटेकल्लुर येथील लोकांची जीवनशैली बदलावी. नवीन सेवक गुरू मेश्राम च्या कार्याला प्रभुने आशिर्वादित करावे. यासाठी प्रार्थना करा.

२६. कर्नाटक

बोगानाहाली सेवाक्षेत्रातील थिप्पाही यांनी सुवार्तेसाठी खुले केले आहे. नवीन ३ लोकांनी आपल्या विश्वासाची कबूली दिली आहे. शरण्णापा यांनी साक्ष दिली आहे– परमेश्वराने त्यांच्या जमीनीला आशिर्वादित केले. चल्लाकेरे सेवाक्षेत्रात नवीन ५ कुटूंबियांनी पहिल्यांदा सुवार्ता ऐकली आहे.

सेवक फिलीप याच्या कुटूंबाचे प्रभुने सांत्वन करावे कारण ते मेंदुला बसलेल्या झटक्याने मरण पावले आहेत. दोडाचेलुरू हनुमाजी २ वर्षांपासुन आजारी आहेत. गोवरा समुद्रा येथील प्रार्थना मंदीराचे नोंदणी आणि बांधकाम होण्यासाठी प्रार्थना करा. कांद्रुपी आणि कोर्लाकुंटा येथील ज्या लोकांनी देवाचे वचन ऐकले त्यांनी विश्वासात मजबुत राहावे यासाठी प्रार्थना करा.

२७. उत्तर प्रदेश– लखनऊ प्रांत

सितापुर, अकबरपुर आणि देयीरामा येथे सुवार्ता कार्याची सुरूवात व्हावी. सेवक बिरेंद्रकूमार यांना परमेश्वराने आजारी अंथरूणात उठविले आणि पुन्हा सेवेत रूजु केले. नवीन विश्वासी बहीण गीता देवी आणि रामप्रसाद यांनी देवाने केलेल्या स्पर्शाची साक्ष सांगत आहेत. मच्चेदिया प्रदेशात अनेक आत्मे वाढत आहेत यांचे आम्ही साक्षी आहोत. परमेश्वराची स्तूती असो.

लखीमपुर खेरी क्षेत्रामध्ये ५ आराधना गट सुरू करण्याचे निश्चय केला आहे. सैदापुर सेवाक्षेत्रात सेवा करण्यासाठी परमेश्वराचे मार्गदर्शन मिळावे. गणेशपुर आणि माथनपुर येथील नवीन विश्वासु लोकांना होत असलेला त्रास परमेश्वराने दुर करावा. जमुनीया आणि माहोलीपुर्वा प्रार्थना मंदीराचे बांधकाम पुर्ण होण्यासाठी प्रार्थना करा.

२८. तेलंगणा

नवीन ७ लोकांनी आपल्या विश्वासाची कबुली दिली. महामारीच्या काळात ४ सेवकांचे व त्यांच्या कूटूंबांचे रक्षण केले. १०० चेंचु लोकगटातील कूटूंबियांना एका महिन्याचे अन्न पुरवठा केले गेलेले आहे. सेवाक्षेत्र मदनपुरम् आणि कोंडामडुगू येथील आवाराचे बांधकाम पुर्ण झाले. प्रभूची स्तुती असो.

परमेश्वराने आम्हाला चारागोंडा मंडल येथे सेवाक्षेत्र उघडण्यासाठी मदत केली. नवीन १६ सेवकांनी प्रशिक्षण पुर्ण केले आहे प्रभुने त्यांचा उपयोग करुन घ्यावा. नोकरी नसलेल्या, गरिब, आणि आर्थिक

समस्या असलेल्या लोकांना परमेश्वराने मोकळे करावे. लक्ष्मी देवी पाली, वीरापुरम आणि मानिकेराम येथील आराधना गटाकरिता प्रार्थना मंदीर बांधण्यासाठी जागा विकत घेण्यात यावी. यासाठी प्रार्थना करा.

२९. आंध्र प्रदेश– श्रीकाकुलम जिल्हा

पेडाराजापुरम् येथील ३० विश्वासी लोकांना परमेश्वराने चांगले आरोग्य दिले. प्रभूची स्तूती असो. २३ लोकांनी आपल्या विश्वासाची कबुली दिली. १२ लोकांनी सुवार्तेचा स्विकार केला आणि विश्वासी संगतीमध्ये सामील झाले. कोटागुडा येथील अन्नेपाया सैतानाच्या तावडीतुन परमेश्वराने मोकळे केले त्याची साक्ष ती देत आहे परमेश्वराची स्तूती असो.

मासागुडा सेवाक्षेत्र येथे विश्वास कबुली ची सभा घेण्यात यावी. सेवक गंगूराव ची कूटूंब, मंडळीतील सभासद, यांना परमेश्वराने सांत्वन दयावे. १५ सेवाक्षेत्रात प्रार्थना मंदीराचे बांधकाम वेळेवर पुर्ण व्हावे. पेठा पेडा आणि गुडा गावातील रस्ते आणि नवीन साधने मिळावेत यासाठी प्रार्थना करा.

३०. आंध्र प्रदेश– पश्चिम गोदावरी जिल्हा

बोइपेन्टा येथील हानुमया याने मद्यपान करणे सोडले आणि देवाचे गौरव करीत आहे. थुंबालाबायलु आणि नुनापल्ली येथे नवीन संपर्क मिळाले आहेत परमेश्वराची स्तूती असो. पवन कुमार याला ख्रिस्तामध्ये नवीन जीवन मिळाले आहे आणि तो देवाच्या वचनाचा प्रचार करीत आहे. आम्ही साक्षी आहोत की जोडीबुडीगुडाम आणि चिन्नाजीपुयडी येथील प्रार्थना मंदीराचे आत्मिक वाढ होत आहेत प्रभूची स्तूती असो. कोरुपोरूगुडेम येथील लोकांनी पश्चाताप करावे आणि सुवार्ता कार्यामध्ये सहभागी व्हावे. कोमारावरम आणि शेजारील गावे परमेश्वराच्या प्रकाशात यावे. अलीवेरू येथील विश्वासणारे वाढावेत. महामारीची भीती लोकांच्या मनातुन दूर व्हावी यासाठी प्रार्थना करा.

एप्रिल व मे हया दरम्यान सेवेतील आमचे १० सेवक व ५ सेवकांच्या पत्नी हया महामारीच्या काळात शिकार झाल्या. व त्यांची प्राणज्योत मावळली त्यांच्या मागे त्यांचा परिवार व लेकरे हयांना सांत्वना मिळावी.

Donate online

Bank : State Bank of India
A/C Name : VISHWA VANI
A/C No. : 34445302072
IFS Code : SBIN0003375
Branch : REBALE T T C- NAVI MUMBAI

कृपया अधिक माहितीकरिता संपर्क साधा-
कल्याण ऑफीस मो. नं. ८००७३७७७३३

वाढ होऊ दया

प्रभुची इच्छा जेथे आहे तेथे आपण चिन्ह आणि चमत्कार हे पाहतो. आणि त्याचा परिणाम सेवाक्षेत्रात प्रार्थना मंदिराची उभारणी होत आहे, हयाचे जीवंत उदाहरण म्हणजे संताली विश्वासणाऱ्यांमध्ये रायपूर सेवाक्षेत्रातील कोकराजी जिल्हयातील आसाम येथे दिसुन येते.

पवित्र आत्म्याने सेवक अंम्पा मूरूले हयाचा उपयोग हया विभागात करून घेतला. नवीन जन्माचा अनुभव घेणाऱ्या एका गटाचे तो मार्गदर्शन करत होता. आणि त्यांचे रूपांतर एका भक्तीगटात झाले. जे लोक रस्त्यावर किंवा एखादया झोपडीमध्ये आराधना करत होते. आणि

हया लोकांनी हा निर्णय घेतला की आपण स्वतःसाठी ५० लोक बसतील असे मंदीर उभारले व त्याचे समर्पण दि. २८.०५.२०२१ रोजी करण्यात आले. प्रभू हया तरूण विश्वासणाऱ्यांना अधिक बळकट करो. व पुढील पिढीसाठी एक आदर्श म्हणुन त्यांना उभे करो.

जमिनीत पडलेला गव्हाचा दाणा

तेव्हा स्वर्गातुन झालेली वाणी मी ऐकली, ती म्हणालीः लिही, प्रभूमध्ये मरणारे आतापासुन धन्य आहेत आत्मा म्हणतो खरेच, आपल्या कष्टांपासुन सुटून त्यांना विसावा मिळेल, त्यांची कृत्ये तर त्यांच्याबरोबर जातात. –प्रकटीकरण १४:१३. कोविडच्या हया दूसऱ्या लाटेमध्ये ५ तरूण पुर्णवेळ सेवक हे जग सोडून सार्वकालिक जीवनात अश्रू न ढाळता गेले. परंतू ख्रिस्ताचे राज्य बांधण्यात त्यांनी कूठलिही कसर सोडली नाही. ते सेवाकार्यात त्याच्या योजनेप्रमाणे नेहमी सर्वांच्या पुढे राहिले.

परंतू ते आमच्याही पुढे प्रभु समोर उभे राहण्यास निघुन गेले. आमचे कान सदोदित गौरवाचे गित ऐकत राहणार जेव्हा गाव खेडयात अनेक आत्म्यांना त्याने प्रभूकडे आणले. प्रभूची स्तूती असो हया ५ तरूणांसाठी आणि त्यांच्या जीवनासाठी त्यांच्यामागे त्यांचे लहान लेकरे व त्यांच्या विधवा पत्नी हयासाठी नेहमी आमच्या प्रार्थना असतील आमच्या सर्व भागीदारांना व प्रार्थना योध्दयांना ही विनंती आहे की आपणही हयासाठी नेहमी प्रार्थनेत त्यांना उचलुन धरा.

ऋषीकेश सिंह राणा, वय- ४५ पाचपेडा सेवाक्षेत्र उत्तराखंड

पवित्र आत्म्याच्या साहाय्याने सुवार्तेची घोषणा करण्यासाठी त्याला खाटिमा सेवाक्षेत्रातील उदमसिंग जिल्हयातील उत्तराखंड मध्ये पाठवण्यात आले. २५६ लोकांनी उघडपणे प्रभूचा स्विकार हया भावाच्या सुवार्ता प्रसाराद्वारे केला व ३ प्रार्थना मंदीरे बांधली गेली. पहाडी प्रदेशात अनेक असंपर्कित गावात त्याचे पाय लागले जेव्हा पाचपेडा खेडयातील विश्वासणाऱ्यांची वाढ होत गेली. तेव्हा त्याने स्वतःची जमीन विश्ववाणी सेवेला दान करून टाकली जेव्हा त्याचा ऑक्सीजन लेवल कमी झाला. तेव्हा तो हया संसर्ग आजाराला बळी पडला आणि पुढील एक आठवडयातुन तो दि. १९.०५.२०२१ रोजी हे जग सोडून गेला. प्रभु त्याची पत्नी व लेकरेर हयांना मोठी सांत्वना व धीर देवो.

मदनलाल वय- ३०, इंदोरा, हिमाचल प्रदेश

मदन लाल यांनी २०१९ मध्ये प्रभूला आपला तारणारा म्हणुन ग्रहण केले. जेव्हा विश्ववाणीचे पास्टर त्यांच्या गावात सुवार्ता घेवुन पोहचले. मोठया विरोधातुन ते उभे राहीले व विश्ववाणी सेवेत पुर्णवेळ सेवक म्हणुन रूजू झाले. त्यांची इच्छा होती की पहाडी प्रदेशात जावून त्यांना ख्रिस्त समजला नाही त्यांना सुवार्ता सांगावी. त्यांनी त्या प्रत्येकाचा शोध घेतला जेव्हा सेवेला प्रार्थनेचे बल देत होते त्यांचा सेवेला जात असताना दि. २४.०३.२०२१ रोजी अपघात झाला. त्यांचा उजवा हात अपघात ग्रस्त झाला व ते दवाखान्यात भरती झाले. २० मे रोजी त्यांचा रिपोर्ट कोरोना पॉझिटिव्ह आला. त्यांना श्वास घेण्याचा त्रास भासू लागला. आणि शेवटी दि. २२.०५.२०२१ रोजी ते प्रभुकडे गेले. त्यांच्या मागे त्यांची पत्नी रजनी, वय- २६, मुलगा नवी, वय-४ आणि मुलगी करूणा, वय-५ महिने आहे. प्रभू त्यांना सांत्वना देवो.

गंगाराव, वय- ४०, रूक्मीनिगूडा- आंध्रप्रदेश

रूक्मीनिगूडा हा संपूर्ण पहाडी प्रदेश आहे. हया डोंगरवाटयावर वर चढणे व उतरणे हे अत्यंत कठीण असे आहे. अशा हया सर्व परिस्थितीमध्ये सुध्दा केवळ देवाची वधस्तंभावरील प्रीती हया सेवकांना त्यांचा घाम आणि अश्रू गाळत सेवा करण्यासाठी मजबुत करत होता. त्यापैकी गंगाराव हा एक होता त्याची सेवा ही फलदायी अशी होती. प्रभू प्रत्येक दिवशी आत्म्याची भर त्यांच्या सेवेत घालत असे आणि त्याचा परिणाम म्हणुन रूक्मीनिगूडा सेवाक्षेत्र १००% प्रभूकडे आले. बंधू. गंगाराव हा मलेरिया आणि टायफाईड हया आजाराने त्रस्त झाला. हा आजार सर्वसाधारणपणे पहाडात काम करणाऱ्या प्रत्येकाला होतो. परंतू तो त्यात कोविड मूळे ग्रासला गेला व त्याच्या ऑक्सीजन लेवल कमी झाला व शेवटी तो २६.०५.२१ रोजी प्रभुकडे गेला. त्याच्या मागे त्याची पत्नी दुर्गामा व ५ लेकरे आहेत कविता-वय-१६, गीता-वय-१२, दिव्या- वय-९, विनोद-वय-६, वेनोश-वय-३ कृपया हया दूःखी कूटूंबासाठी प्रार्थना करा.

रेव्ह. आर. फिलीप, वय- ५२, चल्लाकरे- कर्नाटक

सेवेमध्ये देवाच्या कृपेने तो विजयशाली जीवन जगला कर्नाटकामधील दावनगिरी जिल्हयातील असंपर्कित खेडयात त्याने मागील १८ वर्षे अथक प्रयत्न केले. प्रभूच्या दर्शनाबरोबर तो खूप आवेशी होता. त्याच्यातील सर्व गुणनैपुल्य त्याने जास्तीत जास्त देवाच्या सेवेसाठी खर्च केले. आपल्या सेवेप्रती तो प्रामाणिक होता.

व आपल्या सोबतीच्या सेवकांबरोबर तो प्रेमळपणे व्यवहार करत होता. आणि म्हणुनच थोडयाच अवधित तो वेब मॉनिटर म्हणुन सेवाकार्य करू लागला. त्याला सेवेतील कार्याचे महत्व होते आणि म्हणुनच आपल्या जवळच्या कार्यक्षेत्रात तो अधिक सक्षम म्हणुन काम करत होता.

आणि म्हणुन त्याने आपल्या लहान मुलाला सुध्दा विश्ववाणी प्रशिक्षण केंद्रामध्ये प्रशिक्षण घेण्यासाठी पाठविले. अचानक त्याच्या मेंदुतील नसांमध्ये अडखळण येवू लागले व त्याला शारीरिक त्रास जाणवु लागला व त्याची ट्रिटमेंट सुरू झाली. परंतू त्याला वैदयकिय उपचाराचा काहीहि उपयोग झाला नाही. ३०.०५.२०२१ रोजी तो प्रभुकडे गेला.

प्रभु त्याची पत्नी शंकूतला, मुलगी अक्षता आणि अर्पिता व मुलगा हर्शद कूमार हयांना त्याचप्रमाणे सेवेतील त्याचे सर्व बंधुवर्ग व विश्वासणारे हयांना प्रभू सांत्वना देवो.

बंधू. सलिल जोस प्रभूमध्ये झोपी गेले.

प्रभूच्या सेवकाचे चरण त्याची सेवेतील तळमख प्रभूमध्ये त्याचे चालणे, त्याचा प्रामाणिकपणा व सेवेची तळमख हया गोष्टीची आठवण आमच्या मनामधुन कोणी हिरावून घेवू शकत नाही. त्यांच्या पावलाचा ठसा व वेळसुध्दा पुरू शकत नाही. बंधु. सलिल जोस हयांची तामिळनाडू मधील सेवा ही एका मधमाशी प्रमाणे होती. त्यांची कष्टमय सेवेद्वारे उत्तर प्रदेशातील मिशनरी काम हे मोठया प्रमाणात उदयास आले. तो फक्त ३५ वर्षांचा होता आणि प्रभूने त्याला खूप गूण संपन्न केले होते.

तो आपले सर्व गुण हे प्रभूसाठी खर्च करत असे आणि मिशन क्षेत्रात अनेक प्रार्थना मंदीरे त्याच्या द्वारे उभे झाले.

योजनाबध्द पध्दतिने त्यांचे काम होते. सेवाक्षेत्रात त्यांना एक मानाचे स्थान होते. सलिल जोस हे खुप समर्पित असे सेवक होते प्रभु येशुची सुवार्ता अनेक असंपर्कित खेडयात पोहचावी ही त्यांची मनातील मोठी इच्छा होती.

त्यांनी आपल्या ध्येयाकडे वयाच्या ३० व्या वर्षात वाटचाल केले जे अनेक लोक ६० वर्ष पुर्ण होईपर्यंत सुध्दा करत नाही. त्यांनी आपल्या कामात कधीही बढाई मारली नाही परंतु अत्यंत नम्रपणे त्यांनी सेवा केली.

आणि सलिल जोस हे बंधू आम्हा सर्व प्रियजनांना तसेच विश्ववाणीच्या परिवाराला सोडून दि. २८.०५.२०२१ रोजी प्रभुकडे गेले.

त्यांचे लहान लेकरे सलिना वय- ५ आणि सविरना वय-२ हे आपल्या वडिलांच्या फोटोकडे पाहुन रडत असतात. त्यांना हे कळत नाही की आपले वडील कूठे गेले.

मिसेस. राबिला त्यांची पत्नी प्रभूच्या हया आशेने धीर धरत आहे की प्रभू आपल्या प्रिय जनासोबत परत येणार आहे तेव्हा त्यांच्या पतिची भेट त्यांना होईल. विश्ववाणी परिवार म्हणुन हया भावाच्या जाण्याने आमचे हे मोठे नुकसान झाले आहे. प्रभू त्या सर्वांना त्याची कृपा पुरवो.

प्रकटीकरण २१:४- तो त्यांच्या डोळयांचे सर्व अश्रू पुसून टाकील हयापुढे मरण नाही, शोक, रडणे व कष्ट ही नाहीत, कारण पहिल्या गोष्टी होऊन गेल्या.

-पॉन सुबरसन

महाराष्ट्र सेवा क्षेत्रातून

महाराष्ट्रातील सर्व विश्ववाणी परिवार व भागीदार हयांना प्रभू येशूच्या नावात सलाम...

महाराष्ट्रामधील आमच्या सर्व विश्ववाणी सेवेतील भागीदारांना आमच्या तारणाऱ्या प्रभू येशू ख्रिस्ताच्या नावात सलाम...

आपला सहभाग आणि प्रार्थना निरंतर आमच्या महाराष्ट्रातील विश्ववाणी सेवकांसाठी व त्यांच्या सेवाकार्यासाठी सूरू आहे म्हणून आम्ही अनेक नवीन खेडयापर्यंत सेवकांच्या द्वारे सूवार्ता घेऊन जात आहोत.

जे विश्ववाणी सेवेमध्ये ओझ्याने सहभागी होत आहेत आणि आपला त्याग आणि अश्रूपूर्ण नेत्रांनी सेवेसाठी पेरणी करत आहेत त्या सर्वांचे ख्रिस्तामध्ये आम्ही आभार मानतो.

सेवाक्षेत्रातील अहवाल

विदर्भ–१ सेवाक्षेत्रः– फिल्ड कॉर्डिनेटरः रेव्ह. सत्यदान खंडागळे (भंडारा, गोंदिया)

सेवाक्षेत्रातील जिल्हे...०२	सेवक.....१७
खेडयामधील सेवा.....९१	बायबल अध्ययन वर्ग.....६२
भक्तीगट.....१२	प्रार्थना मंदिरे.....०९

विदर्भ–२ सेवाक्षेत्रः– फिल्ड कॉर्डिनेटरः रेव्ह. नितीन वासनिक (चंद्रपूर, गडचिरोली)

सेवाक्षेत्रातील जिल्हे...०२	सेवक.....१७
खेडयामधील सेवा.....९६	बायबल अध्ययन वर्ग.....४१
भक्तीगट.....०६	प्रार्थना मंदिरे.....०३

खांदेश सेवाक्षेत्रः– फिल्ड कॉर्डिनेटरः रेव्ह. वासू चौधरी (धुळे, नंदूरबार)

सेवाक्षेत्रातील जिल्हे...०२	सेवक.....१९
खेडयामधील सेवा.....८८	बायबल अध्ययन वर्ग.....४८
भक्तीगट.....१८	प्रार्थना मंदिरे.....१३

मध्य महाराष्ट्र सेवाक्षेत्रः– वेब मॉनिटरः रेव्ह. रमेश गावित (अहमदनगर)

सेवाक्षेत्रातील जिल्हे...०१	सेवक.....०४
खेडयामधील सेवा.....२३	बायबल अध्ययन वर्ग.....१२
भक्तीगट.....०४	प्रार्थना मंदिरे.....०२

मराठवाडा सेवाक्षेत्रः– फिल्ड कॉर्डिनेटरः रेव्ह. नागनाथ सूर्यवंशी (लातूर, नांदेड)

सेवाक्षेत्रातील जिल्हे...०२	सेवक.....२१
खेडयामधील सेवा...१०७	बायबल अध्ययन वर्ग.....९२
भक्तीगट.....२२	प्रार्थना मंदिरे.....१५

विनंती आहे कि हया सर्व विषयांसाठी प्रार्थना करा:

- महाराष्ट्राच्या सेवाक्षेत्रामध्ये जाणारे नवीन २० सेवकांसाठी प्रार्थना करा की त्यांचे सेवाकार्यामध्ये जाणे आशिर्वादित व्हावे.
- २० नवीन सेवकांसाठी १८ सायकलची गरज आहे.
- महाराष्ट्राच्या अनेक गावामध्ये कोविड–१९ चा वाढता प्रादूर्भाव दूर व्हावा.
- आमचे सेवक बंधू. बूधाजी गेडाम हे कोविड–१९ पॉझिटिव्ह आहेत त्यांना आरोग्य मिळावे यासाठी प्रार्थना करा.
- देउळगाव, देगलूर आणि चांदोरी येथील प्रार्थना मंदीरांचे बांधकाम लवकरात लवकर पूर्ण व्हावे.

बंधू. सूनिल धूर्वे
मिशन कॉर्डिनेटर, कल्याण
मो.९८२३७६३५७६

74 नवीन सेवक नवीन सेवाक्षेत्र

पवित्र आत्म्याची आम्ही स्तूती करतो की त्याने नवीन सेवक सुवार्तेची घोषणा करण्यासाठी गरजवंत राज्यांमध्ये उत्तरप्रदेश, बिहार, झारखंड आणि मध्यप्रदेश मध्ये पाठवले.

त्यांच्या ३ महिन्यांच्य प्रशिक्षणा नंतर २५ नवीन सेवक सुरेरी प्रशिक्षण केंद्रातुन गेले. ४९ सेवक त्यांच्या ३ महिन्याच्या प्रशिक्षणानंतर नवटोली प्रशिक्षण केंद्रातून दि.१३.०६.२१ रोजी झारखंड येथे पाठवले गेले.

हया सेवकांच्या द्वारे ३६० गावामध्ये सेवा सुरू करण्यात आली. ज्या गावामध्ये त्यांचे पाय लागले तेथील गावातील बंधी, सैतानी शक्ती व जगातील बंधणे तुटल्या जातील.

प्रभूची शांती त्यांना मिळो, आनंद आणि समृध्दी त्यांना उंच करो. प्रभूची कृपा हया सर्व गावावर हया सेवकांच्या द्वारे विपुल प्रमाणात ओतल्या जावो.

आपणासमोर एक मोठी संधी पूर्णविळ सेवकांची वैदयकीय काळजी घेण्यासाठी मदतीची गरज आहे.

विश्ववाणी मध्ये जे पूर्णवेळ सेवक कार्य करतात ते सर्व स्थानिक सेवक असतात. १००% सेवक हे त्या राज्यातील व त्या लोकगटातील असतात ते आपल्या लोकांमध्ये त्यांच्या भाषेत व त्यांच्या संस्कृती मध्ये सेवाकार्य करत असतात. विश्ववाणी ही एक संस्था म्हणून १९८५ मध्ये तिची सरकारी दप्तरमध्ये नोंद करण्यात आली. तेव्हा ४२ सेवक पूर्णवेळ कार्य करत होते. आज भारतात ४२१५ पूर्णवेळ सेवक आपआपल्या भाषेत सुवार्तेचे कार्य करत आहेत.

हंगामाचा धनी आज आमच्या अपेक्षेपेक्षा ही जास्त आम्हाला देत आहे की आम्ही खेडोपाडयात सेवा घेऊन जावे हे केवळ त्याच्या सामर्थ्याने तो आमच्याद्वारे हे कार्य करून घेत आहे.

स्वर्गीय पिता हे सर्व आश्चर्यकारक रित्या सूव्यवस्थितपणे सुवार्तेच्या कार्याची मांडणी विश्ववाणी च्या द्वारे सेवा क्षेत्रात करत आहे आम्ही सामाजिक कार्य करण्यासाठी विश्ववाणी मध्येच अजून एक पूरक संस्थेची नोंद सरकारी कार्यालयात १९९४ रोजी केली ज्याचे नाव आम्ही विश्वासी संगती असे ठेवले आहे.

हया संस्थेद्वारे वेगवेगळया प्रकारचे सामाजिक कार्य राबवल्या जाते. जसे मूलामूलींची वस्तीग्रहे, लहान प्रमाणात उदयोग, स्वंयरोजगार, शिक्षण, आरोग्य स्वच्छ पाणीपूरवठा आपतकालीन योजना इ. अनेक दिवसापासून आम्ही प्रार्थना करत होतो आणि विचार विनिमय करत होतो की दूर्गम खेडयात जेथे आमचे सेवक काम करत आहेत त्यांच्या कूटूंबासाठी वैदयकीय मदत कशाप्रकारे आम्हाला पूरवता येईल.

आम्ही एक दीर्घकालीन योजना तयार केली की जे सेवक सेवेत असताना मरण पावतात त्यांच्या विधवा पत्नीला दीर्घ काळ मदत देता यावी.

कारण येणाऱ्या दिवसात आम्हाला २०,००० सेवक सेवेमध्ये घ्यायचे आहेत. आणि म्हणून आम्ही अगदी विश्वासाने हा निर्णय घेतला तसेच विश्ववाणी बोर्ड हयांची परवानगी व मान्यता घेऊन काळजी आणि गरजूंसाठी संस्था (डेलळशीं षेी लरीश रपव छशशवू) ही एक पूरक संस्थेची नोंद सरकारी कार्यालयात केली.

हे एक विश्ववाणीचे पूरक अंग असून हया संस्थेद्वारे आम्ही खेडयातील सेवकांना वेळेमध्ये लागणारी तातडीची वैदयकीय मदत पूरवू शकू तसेच अपातकालीन मदत, अपघात कालीन मदत, आजारपण हया सेवा आम्ही पूरवू शकू.

कृपया आपण हया सेवेमध्ये आपला सहभाग देऊन हया मध्ये बाधित झालेल्या सेवकांना मदतीचा हातभार लावू शकतात. कृपया खाली दिलेल्या बँक खात्यामध्ये आपण आपली मदत पाठवू शकता व योग्य ती पावती मिळवू शकता.

A/C Name: **SOCIETY FOR CARE AND NEEDY**
Bank: **STATE BANK OF INDIA**
A/C No.: **40170 153 077**
IFSC Code: **SBIN0017247**
Branch: **Korattur, Chennai**
Branch Code: **17247**

Please update us with your transaction detail to acknowledge with receipt ✆ 944 445 5646

महामारीच्या हया कठीण दिवसांतील परिणाम सेवाक्षेत्रातील गरजा हया ओरड करत होत्या.

लॉकडावून चा हा काळ म्हणजे मदतीचा काळ ठरला. परमेश्वराने लोकांना

सुवार्तेमध्ये मजबुत करण्यासाठी आमचे हात मजबूत केले.

त्यांची महत्वाची गरज अन्नधान्य वैदयकीय होती.

आणि आम्ही ती जबाबदारी आमच्या देणगीदाराकडून उचलली

व हया हजारो गरजवंत लोकांना मानसिक, शारीरिक व आत्मिक बल दिले.

प्रभूची स्तूती असो.

VISHWA VANI SAMARPAN (Web copy) - MARATHI LANGUAGE
Printed and Published by P. Selvaraj on behalf of VISHWA VANI, a registered society (Regn. No.17871 of 1987) and printed at CAXTON Offset Pvt. Ltd., 11-5-416/3, Red Hills, HYD-04. and published at 1-10-28/247, Anandapuram, ECIL Post, HYD-62. EDITOR: P. SELVARAJ.